लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps




पान 3 / राज्यकर्त्यांनीच एक रुपयाची...

जळगाव, गुरुवार, दि.१ मे २०२५ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -१७३ • पाने ६ • किंमत ३ रु.

## सुट्टीची सूचना

**लोकशाही**

गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी दैनिक लोकशाही कार्यालयाला महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त सुट्टी असून शुक्रवार दि. २ मे २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार व विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

## सोने-चांदी

- सोने (प्रति १० ग्रॅम) : ९४,७७०
- चांदी (प्रति १ किलो): ९५,७७०

## तापमान

- कमाल : ४४ अंश सेल्सिअस
- किमान : २६ अंश सेल्सिअस

## महत्वाचे

### हॉटेलमध्ये भीषण आगीत चौदा जणांचा मृत्यू

**कोलकत्ता :** पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथून मोठी बातमी समोर येत आहे. मंगळवारी रात्री कोलकातामध्ये मेचुआपट्टी भागातील श्रुतराज हॉटेलमध्ये भीषण आग लागली.
या आगीत १४ लोकांचा होरपळून मृत्यू झाला.
तर काही जणांनी जीव वाचवण्यासाठी हॉटेलच्या इमारतीतून उड्या घेतल्या.
या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.
अग्निशमन दलाच्या गाड्यांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. कोलकाताचे पोलीस आयुक्त मनोज कुमार वर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''श्रुतराज हॉटेलमध्ये रात्री ८.१५ वाजता आग लागली. या आगीत १४ जणांचा मृत्यू झाला आहे. तर हॉटेलमध्ये अडकलेल्या अनेकांना बचाव पथकांनी सुरक्षितपणे बाहेर काढले आहे. या आगीवर सध्या नियंत्रण मिळवण्यात आले आले. मात्र तरीही मदत आणि बचाव कार्य अजूनही सुरू आहे.

### मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी देवेन भारती

**मुंबई –** देवेन भारती यांची मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त आहेत. विवेक फणसाळकरांच्या निवृत्तीनंतर देवेन भारती यांच्याकडे मुंबई पोलीस आयुक्तपद देण्यात आलं आहे. विवेक फळसाळकर हे आज ३० एप्रिल रोजी निवृत्त झाले. त्यांच्यानंतर आयुक्तपदासाठी सदानंद दाते, संजयकुमार वर्मा, रितेश कुमार, महिला पोलीस अधिकारी अर्चना त्यागी यांच्या नावाची चर्चा होती.

# देशात जातनिहाय जनगणना होणार!

## केंद्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय : मंत्री अश्विनी वैष्णव यांची घोषणा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

केंद्र सरकारने आता देशभरात जातीय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली. केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक आज पार पडली. या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. केंद्रीय रेल्वे तथा देशाचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या विविध निर्णयांची माहिती दिली. यावेळी त्यांनी मोठी घोषणा केली. केंद्र सरकारने आता देशभरात जातीय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली. देशभरात



जातनिहाय जनगणना केली जावी, अशी गेल्या अनेक दिवसांपासून विरोधकांकडून मागणी केली जात होती. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी अनेकदा हा मुद्दा लावून धरला होता. देशाच्या विकासात कुणाचे किती योगदान आहे ते जाणून घेण्यासाठी कुणाची संख्या किती आहे ते समोर यावे, अशी भूमिका राहुल गांधी यांनी याआधी अनेकदा मांडली आहे. त्यामुळे त्यांची मागणी आजच्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत पूर्ण झाल्याचे बघायला मिळत आहे.

कॅबिनेट कमिटी ऑन पॉलिटिकल अफेअर कमिटीची देखील आज बैठक झाली. या बैठकीत स्वत: अश्विनी वैष्णव यांनी त्याबाबत माहिती देताना सांगितले की, दिवंगत माजी पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी संसदेत भाषण देताना म्हटले होते की, जनगनणा केली जाईल. पण नंतर सोशो इकोनॉमिक सर्वेक्षण केले गेले. त्यामध्ये जातीचा विचार केला गेला होता. पण त्याचे आकडे जाहीर झाले नव्हते. काही राज्य सरकारने सर्व्हे करण्याचा प्रयत्न केला होता. पण राज्य

### ऊसाचे दर निश्चित!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही ऐतिहासिक तिसरी टर्म आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी देखील आज मोठा निर्णय घेण्यात आला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा हा निर्णय घेण्यात आला आहे. ऊसाचे दर केंद्र सरकारकडून ठरवण्यात आले आहेत, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली.

### शिलाँग ते सिल्चर कॉरिडोअर मंजुरी

शिलाँग ते सिल्चर कॉरिडोअर मंजुरी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. मेघालय आणि आसामला जोडणाऱ्या हायस्पीड हायवे असा शिलाँग ते सिल्चर कॉरिडोअरला आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. हा खूप मोठा प्रोजेक्ट आहे. २२ हजार ८६४ कोटी रुपये इतका या प्रोजेक्टचा नियोजित खर्च आहे. उत्तर-पूर्व भारताच्या कनेक्टिविटीसाठी हा महत्त्वाचा प्रकल्प आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

पान २ वर »

# राहुल गांधीचे सरकारला तीन प्रश्न

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे. या निर्णयामुळे देशात कोणत्या समाजाचे किती प्रतिनिधीत्व आहे, हे समजू शकणार आहे. मात्र काँग्रेसचे नेते तथा खासदार राहुल गांधी यांनी केंद्र सरकारला याच विषयावर घेरलं आहे. त्यांनी जातीनिहाय जनगणनेविषयी केंद्राला तीन गंभीर आणि महत्त्वाचे प्रश्न विचारले आहेत. केंद्र सरकारच्या निर्णयानंतर राहुल गांधी यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयावर



काँग्रेसची भूमिका मांडली. त्यांनी सरकारच्या याचा थेट विरोध केला नसला तरी तीन मूलभूत प्रश्न विचारले आहेत. सरकारने या प्रश्नांची उत्तरं द्यावीत, अशी अप्रत्यक्ष मागणीच त्यांनी केली आहे. पत्रकाराच्या एका प्रश्नाचे उत्तर देताना राहुल गांधी म्हणाले की, संभ्रम निर्माण करण्याचे माझे काम नाही. मी ठोस माहितीच्या आधारावर बोलतो. संभ्रम निर्माण करण्यात मला रस नाही. त्यांनी हा निर्णय आताच का घेतला? यातही मला काही रस नाही. सरकारने हे मोठे पाऊल उचलले आहे. मला फक्त जातीनिहाय जनगणना कधी होणार? जातीनिहाय जनगणना कशा प्रकारे केली जाईल? या जनगणनेत कोणत्या प्रकारचे प्रश्न असतील? या प्रश्नांची उत्तरं जाणून घ्यायची आहेत, असं राहुल गांधी यांनी म्हटलंय. तसेच, आम्ही जातीनिहाय जनगणना केली, असं सरकार म्हणू शकतं. पण तुम्ही या जनगणनेत योग्य ते प्रश्नच विचारले नाही तर या जनगणनेचा काहीही फायदा नाही, असेही त्यांनी सांगितले. तेलंगाणा राज्यात जनगणना करण्याआधी आम्ही लाखो लोकांकडून सल्ला घेतला. आम्हाला लोकांची जातीनिहाय जनगणना

पान २ वर »

# पक्ष प्रवेशाने 'त्यांचे' लफडे बंद होतील असे नाही!

## मंत्री गुलाबराव पाटील यांचा टोला : महायुतीत होणार वादविवाद

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

जिल्ह्यात सध्या राजकीय वातावरण तापले आहे. महाविकास आघाडीमधून अनेक नेते अजित पवार यांच्या राष्ट्रवादी गटात जात आहे. जळगाव जिल्ह्यातून माजी मंत्री डॉ. सतीश पाटील व गुलाबराव देवकर हे पुन्हा हाती घड्याळ बांधण्याच्या तयारी असून पालकमंत्री तथा शिवसेना नेते गुलाबराव पाटील यांनी जोरदार टोला हाणला आहे. ते सत्ताधारी पक्षात आले तरी त्यांची लफडे बंद होतील असे नाही म्हणत त्यांनी निशाना साधला.



पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी अक्षय तृतीयेनिमित्ताने राज्यभरातील जनतेला खान्देशची बोलीभाषा असलेल्या अहिराणी भाषेत गण म्हणत शुभेच्छा दिल्या आहेत. खानदेशात माजी मंत्री डॉ. सतीश पाटील, गुलाबराव देवकर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेशाबद्दल गुलाबराव पाटील यांनी भाष्य केले आहे. प्रवेश केला म्हणून त्यांचे लफडे बंद होईल असे नाही, ते कशा करता जात आहेत हे अख्या जगाला माहिती आहे, असा टोला पाटील यांनी लगावला. मजूर फेडरेशनमधील घोटाळा, जिल्हा बँकेतून पाच कोटींचे घेतलेले कर्ज प्रकरण यामुळे ते अडचणीत आहेत. निवडणूक आयोगाकडे

### महायुतीत होणार वादंग!

आगामी काळात होवू घातलेला हा पक्ष प्रवेश महायुतीसाठी डोकेदुखी ठरणार आहे. जे अजित पवार गटात प्रवेश करीत आहेत त्यांनी यापुर्वी महायुतीच्या उमेदवाराविरुद्ध दंड थोपटले होते. हाच मुद्दा कार्यकर्त्यांना पचणी पडत नाही. पारोळ्यात डॉ. सतीष पाटील हे विद्यमान आमदार अमोल पाटील, जळगाव ग्रामीणमध्ये गुलाबराव देवकर मंत्री गुलाबराव पाटील यांच्या विरोधात उभे ठाकले होते. चोपड्याचे माजी आमदार कैलास पाटील आणि आमदार प्रा. चंद्रकांत पाटील यांच्यात सख्य नाही. प्रवेश घेवू इच्छिणाऱ्यांमुळे महायुतीत मात्र वादंग होईल हे निश्चित!

पान २ वर »

# गोळीबार करणारे सहा आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

## शहरातील घटना : रामानंद नगर पोलिसांची कारवाई

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

शहरातील सेंट जोसेफ शाळेसमोरील मीनाताई ठाकरे मार्केट येथे दि.२४ एप्रिल रोजी रात्री एका तरुणावर गोळीबार करण्यात आला होता. याप्रकरणी रामानंद नगर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात पोलिसांनी सहा संशयीत आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी गावठी बनावटीचे पिस्टल हस्तगत केले असून घटनास्थळावरुन एक जिवंत काडतुस, दोन खाली केस व कोयता हस्तगत करण्यात आला आहे. शहरातील सेंट जोसेफ शाळेसमोरील मीनाताई ठाकरे मार्केट येथे दि.२४ एप्रिल

### संशयित पोलिसांच्या जाळ्यात

रामानंद नगर पोलिसांनी विशाल भिका कोळी (पिस्टलसह), अक्षय उर्फ बाब्या बन्सीलाल धोबी, धिरज उर्फ वैभव उर्फ गोलु कोळी, सागर अरुण भोई उर्फ जाड्या भोल्या, नितेश मिलिंद जाधव, गिरीश किशोर घुगे यांना अटक करण्यात आली असून आरोपी गिरीश किशोर घुगे याचेकडून गावठी बनावटीचे पिस्टल हस्तगत केले आहे.

पान २ वर »

# पाकच्या संरक्षण मंत्र्याचा मोठा गौप्यस्फोट


**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

भारत आणि पाकिस्तानमधील तणाव प्रचंड वाढला आहे, अशा परिस्थितीमध्ये अमेरिकेची भूमिका काय असणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. मात्र अमेरिकेनं तटस्थ भूमिका घेतली आहे. पहलगामध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला, या हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या आहेत. सिंधू नदी पाणी वाटप कराराला स्थगिती देण्यात आली आहे. अटारी बॉर्डर देखील बंद करण्यात आली आहे. तसेच पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले असून, त्यांना त्यांच्या देशात परतण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भारताच्या



या निर्णयामुळे पाकिस्तानचा जळफळाट सुरू आहे. पाकिस्तानने भारतासोबत व्यापारावर बंदी घातली आहे, तसेच भारतासाठी हवाई हद्द देखील बंद केली आहे. दरम्यान भारत आणि पाकिस्तानमधील तणाव प्रचंड वाढला आहे, अशा परिस्थितीमध्ये अमेरिकेची भूमिका काय असणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. मात्र अमेरिकेनं तटस्थ भूमिका घेतली आहे. भारत -पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं की, भारत आणि पाकिस्तान दोन्ही देश आम्हाला जवळचे आहेत. त्यांच्यामध्ये नेहमीच तणाव राहिला आहे, मात्र ते यावर तोडगा काढतील. त्यानंतर अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्यानं देखील मोठं वक्तव्य केलं आहे. दोन्ही देशांमध्ये तणाव आहे, आम्ही दोन्ही देशांच्या संपर्कात आहोत. दोन्ही देशांनी यावर चर्चेनं मार्ग काढावा असं परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॉम ब्रूस यांनी म्हटलं आहे. मात्र अमेरिकेची ही भूमिका पाकिस्तानच्या चांगलीच जिव्हारी लागल्याचं पाहायला मिळत आहे. पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांनी अमेरिकेच्या या भूमिकेवर नाराजी व्यक्त करताना

पान २ वर »




# तंत्रज्ञानातून शेतीला बळ मिळते!

## फालीच्या दुसऱ्या टप्प्यात शेतकऱ्यांशी विद्यार्थ्यांचा संवाद

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

कुठलाही उद्योग व्यवसायाच्या भरभराटीसाठी कृषी क्षेत्र महत्त्वाचे आहे. शेतमाऊली एका दाणाचे हजार दाणे देत असते त्यामुळे रोजगाराची निर्मितीसुद्धा यातून होते. शेत, शेतकऱ्यांना सन्मानाची वागणूक मिळाली तर खऱ्या अर्थाने शेतकरी पोशिंदा ठरेल यासाठी फाली च्या माध्यमातून देशाच्या भविष्याची गुंतवणूक आपल्या माध्यमातून समृद्ध



होत आहे. एआय चा वापर, ऑटोमेशन, ड्रोन चा वापर यासह तंत्रज्ञानामुळे शेतीला बळ मिळते. 'फ्युचर ॲग्रिकल्चर लीडर्स ऑफ इंडिया' (फली) अकरावे अधिवेशनच्या दुसऱ्या टप्प्याची आज जैन हिल्सला सुरवात झाली. क्षेत्रभेटीनंतर शेतीविषयी सुसंवादात शेतकऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. आकाश ग्राऊंडवर झालेल्या चर्चासत्रात स्वप्नील चौधरी-नाचनखेडा, निरज चौधरी-दापोरा बु-हाणपूर, लोकेश रोटे-नशिराबाद, दीपक अरूण पाटील, सोनाळा-जामनेर,कल्पेश पाटील-नशिराबाद या शेतकऱ्यांनी संवाद साधला. केळी, हळद, कापूस, डाळिंब, तुर, टरबूज, जैन स्विट ऑरेंज, मोसंबी, लिंबू, हरभरा उत्पादनातील बारकावे शेतक-यांनी सांगितले. सौलर योजनेसह टिश्यूकल्चरच्या माध्यमातून केळीच्या नफ्याचे गणिते, निर्यातक्षम उत्पादनासाठी जागतिक मानांकनासह शेती करण्याच्या पद्धती, तरूणांनी शेतीमध्ये

पान २ वर »

पान ५ वरून

## भालोद येथे आज ...

अजय कोळी, जयंत कोळी, उमेश कोळी, दिपक कोळी, पिंटू कोळी, पवन कोळी, नारायण कोळी, गोविंदा कोळी, निखिल कोळी, गणेश कोळी, मयुर कोळी, गोलु कोळी, छोटु कोळी, तसेच सरपंच प्रदीप कोळी, बारागाड्या बांधणारे, तसेच भगताच्या दोन्ही बाजुला असलेले महत्वाचे भगत, ग्रामपंचायत सर्व सदस्य, सर्व गावकरी यांचे अनमोल सहकार्य लाभते.

## अनुभूती निवासी स्कूलचा...

अनुभवाधीरीत शिक्षण देणारी स्कूले आहे. सीआयसीएसई या पॅटर्नची कान्हदेशातील पहिलीच शाळा आहे. परस्परांमधील निर्भरता वाढावी, आंत्रपिनर्स निर्माण होणे यादृष्टीने गुणवत्तापूर्ण उपक्रम राबविले जातात. छंद जोपासत वर्षभर होणाऱ्या विविध स्पर्धा, उपक्रमांमध्ये कौशल्य दाखवित विद्यार्थीही यश संपादित करतात. भविष्याचे वेध घेत असताना शैक्षणिक अभ्यासक्रमासह आपल्यातील सूप्त कलागुणांना जोपासून विद्यार्थ्यांनी गुणवत्तेच्या आधारे प्राप्त केलेले यश गौरवास्पद आहे. यासाठी विद्यार्थ्यांसह शिक्षकवृंद, शिक्षकतेतर कर्मचारी यांच्यासह पालकांचेही अभिनंदन होत आहे. अनुभूती स्कूलचे संचालक मंडळ, अशोक जैन, अतुल जैन, निशा अनिल जैन, प्राचार्य देबासिस दास यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेतील दहा...

प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. याशिवाय इतर गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे, राजलक्ष्मी मुकेश आव्हाळे १८८गुण (६२.६६%) ,नितिन संजय चव्हाण १८८ गुण (६२.६६%), राजनंदिनी विशाल ढगे १७८ गुण (५९.३३%) ,दर्शना बालमुकुंद अग्रवाल १७८ गुण (५९.३३%), तनिष्का दिग्विजय सूर्यवंशी १७४ गुण (५८.००%) , अमित रज्जाक तडवी १५८ गुण (५२.६६%), प्रतीक श्रीराम बोंडे १५६ गुण (५२.००%) तसेच, आठवीचे दोन विद्यार्थी व्यंकटेश देविदास बारी, श्रद्धा किरण बडगुजर या विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा सत्कार सोसायटीचे पदाधिकारी, शिक्षकवृंद व पालकांच्या उपस्थितीत करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष, संजय गरुड यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## भाजप अध्यक्ष निवडीत...

पार्श्वभूमी नसलेल्या पक्षाशी प्रामाणिक कार्यकर्त्यांना अध्यक्षपदी संधी मिळाल्याबद्दल नवीन पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून त्यांचे स्वागत होत आहे. सदर निवडीबद्दल ना. गिरीष महाजन, खासदार स्मिता वाघ, रवि अनासपुरे, आ. मंगेश चव्हाण, विजय चौधरी, ज्ञानेश्वर जळकेकर महाराज, नंदुभाऊ महाजन, डॉ. राधेश्याम चौधरी, मधुकर काटे, सुभाष पाटील, अमोल पाटील यांनी नवनियुक्त मंडल अध्यक्षांचे अभिनंदन केले. याबैठकीला भाजपाचे उपजिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील, जिल्हाकोषाध्यक्ष कांतीलाल जैन, व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष रमेश वाणी, वैद्यकीय आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. शांतीलाल तेली, हिम्मतसिंग निकम, नंदू सोमवंशी, विनोद महाजन, योगेश माळी संजय झेरवाल बापू चौधरी, गणेश पाटील, गोकुळ राठोड, स्वप्निल पाटील, संजू पाटील आदी उपस्थित होते. अमोल शिंदे समर्थकांचे वॉकआउट शासकीय विश्रामगृहावर पक्षाचे निरीक्षक व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मंडलाध्यक्षांच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण होत असताना नाराज असलेले अमोल शिंदे समर्थक यांनी बैठकीतून काढता पाय घेतला. त्यामुळे पाचोरा शहर मंडळाचे अध्यक्ष निवड स्थगित करण्यात आली आहे. नव्याने निवड करण्यात आलेले पदाधिकारी अमोल शिंदे यांच्या खेम्यातील नसल्यामुळे निवड प्रक्रियेत अमोल शिंदे यांना शह बसल्याचे बोलले जात असून शिंदे यानंतर काय भूमिका घेतात. याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहेत.

## मुकुंद नगर केंद्रात...

३० च्या महानैवेद्य आरती होऊन दिंडोरी प्रणित मार्गातील १८ विभाग यांचे सखोल मार्गदर्शन अनिल बारी यांनी केले तसेच केंद्राच्या माध्यमातून पुढील कार्यक्रमाचे देखील वाचन व स्वतःच्या झालेल्या सेवेचे वाचन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी परिसरातील भाविक भक्त व केंद्रातील सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण अखंड नाम जप यज्ञ सप्ताह यशस्वी होण्यासाठी केंद्र प्रतिनिधी रवींद्र पाटील यांच्यासह केंद्रातील सर्व विभागातील प्रतिनिधी सर्व सेवेकरी महिला पुरुष यांनी अनमोल असे सहकार्य करून कार्यक्रम व सप्ताह यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## मुबारक तडवींचे...

अर्ज सचिव यांनी वाचून दाखविले, त्यावेळी उपस्थित सदस्य सरपंच व उपसरपंच यांनी विचार विनिमय करून गावात दारूबंदी करण्यात यावी असे सभेत सर्वानुमते ठरविले, सदर ठराव पुढील कार्यवाही साठी दारूबंदी विभाग जळगांव यांना पाठविण्यात यावा असा ठराव करण्यात आलेला होता व आहे. आज रोजी ६ महिने होऊन देखील कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसून, दारू मोठ्या प्रमाणात गावात विक्री केली जात आहे, दारू विक्री करणारे म्हणतात आम्ही पोलिसांना हप्ते देतो म्हणून दारू विक्री आमची चालूच राहील, कितीही ठराव केले तरी आमचे काहीच होणार नाही, अश्या प्रकारचे भाष्य करत असतात. याबाबतचे निवेदन मुबारक तडवी यांनी दि. २/०४/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक यावल पोलीस स्टेशन यांना दिलें होते, मात्र कार्यवाही झाली नाही म्हणून १ में महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून त्यांनी ग्रा. पं. चुंचाळे ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच व सदस्य यांच्या व दारू विक्री करणाऱ्यांच्या विरोधात बंड पुकारले आहे, अशी माहिती मुबारक तडवी यांनी आमच्या प्रतिनिधी सुपडू संदानशिव यांच्या सोबत चर्चा करतांना सांगितले आहे.

## सिंधूताई सपकाळ यांचे...

जीवन समर्पित केले सुमारे ३०० मुलींचे विवाह सोहळा करून त्यांचे जीवन उभे केले ४०० गायीचा सांभाळ केला आणि हे सर्वकार्य समाजातील उदार लोकांचे मदतीने सुरू आहे. कोणतेही सरकारी अनुदान नाही मुलांची संख्या वाढली आहे. यांची व्यवस्था होणेसाठी शिरूर येथे शाखा सुरू केली आहे. या साठी सोलापूर येथील वासुदेव व्हटकर यांनी १५ हजार चौरस फूट जागा दान केली आहे या जागेवर ३०० विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृहाचे बांधकाम सुरू केले आहे. यासाठी फैजपूर हुन आर्थिक मदत केली जाईल अशी माहिती याप्रसंगी नरेन्द्र नारखेडे यांनी उपस्थित व्यवस्थापन मंडळास दिली. याप्रसंगी व्यवस्थापक सचिन ढोरमले, अधीक्षक मीनाक्षी लतांबळे, सह व्यवस्था पक पायल तायडे, भाऊसाहेब मांडले, दत्ता जाधव, अक्षय खरमाळे, अध्यक्ष विनय सिंधुताई सपकाळ हे उपस्थित होते. यांनी नरेंद्र नारखेडे व समवेत असलेले विशाल सुभाष इंगळे पुणे यांचे स्वागत केले व सर्व नवीन कार्याची माहिती दिली. समाजातील दानशूर। व्यक्तींनी या वसतिगृह इमारत बांधकासास उदारहस्ते मदत करावी, असे आवाहन नरेंद्र नारखेडे यांनी केले आहे.

## तालुकास्तरीय बक्षीस...

या स्पर्धेचे बक्षीस २८ एप्रिल रोजी सोमवारी यावल प. स. सभागृहात बक्षिस वितरण करण्यातआले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चोपडा मतदारसंघाचे आ. प्रा चंद्रकांत सोनवणे होते. व्यासपीठावर यावल तहसीलदार मोहनमाला नाझीरकर, गटविकास अधिकारी डॉ मंजुश्री गायकवाड, गटशिक्षणाधिकारी विश्वनाथ धनके, शापोआ अधीक्षक मगर साहेब, संस्थेचे माननीय अध्यक्षा, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष व सर्व संचालक मंडळ, तसेच तालुक्यातून द्वितीय व तृतीय क्रमांकाने आलेल्या शाळांचे संस्थाचालक, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधून प्रथम तीन क्रमांकाने आलेल्या शाळांचे मुख्याध्यापक, तथा शिक्षक- शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यालयाला प्रथम क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. यात विद्यालयाला तीन लाख रुपयांचा धनादेश, प्रशस्तीपत्र, व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यालयाला तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवण्यात संस्थेच्या अधयक्षा विद्या वसंतराव महाजन, उपाध्यक्ष सुभाषराव महाजन, कार्याध्यक्ष प्रमोद सोनवणे, संचालक शामकांत महाजन, व सर्व संचालक मंडळ तसेच विद्यालयाचे प्राचार्य आर जे महाजन, पर्यवेक्षक एस जे पवार, यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार एन पी पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य पर्यवेक्षक शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## वाचन करून महापुरुषांची...

पत्रकार रविंद्र हिरोळे यांनी उपस्थित स्पर्धकांना महापुरुषांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती नाचून नव्हे तर वाचूनच साजरी केली जाऊ शकते असे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुणे म्हणून पंकज हिरोळे, दीपक हिरोळे, प्रशांत हिरोळे, विनोद थाटे, शिवाजी वानखेडे, गौतम वाघ, राजू सोनवणे, वायला पोलीस पाटील सुनील तायडे, राहुल इंगळे उपस्थित होते. केंद्र प्रमुख गणेश कोळी, मुख्याध्यापक देवानंद नमायते, समाधान निकम, महादेव कोळी, विष्णू कोळी, पद्माकर तायडे, उपसरपंच अर्जुन इंगळे, अशोक निकम, जितेंद्र तायडे, गोलू कांडेलकर, राजू कोळी, राजू तायडे, कडू पिळोदकर, अजय गायकवाड, भूषण निकम, कैलास इंगळे, दादाराव निकम, चंद्रभान निकम, विलास सावळे, किशोर इंगळे व सम्राट अशोक सामाजिक संघ कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अशोक निकम यांनी केले.

## साकळी येथे दोन दिवशीय....

महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. या दोन दिवसीय उन्हाळी शिबिरात पहिल्या दिवशी दहिगाव येथील आदर्श विद्यालयाचे कलाशिक्षक अजय पाटील यांनी चित्रकला तर न्हावी विद्यालयाचे कलाशिक्षक व्ही ओ चौधरी यांनी निसर्ग चित्र रेखाटन याविषयी मार्गदर्शन केले तर दुसऱ्या सत्रात सावदा येथील कलाशिक्षक जयेश पाटील यांनी मातीकाम याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यात शाळू मातीतून विविध कलाकृती विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतल्या. तर दुसऱ्या दिवशी सजावटीसाठी टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे तसेच कागद काम याविषयी परसाळे येथील जि प प्राथमीक शाळेच्या शिक्षिका सौ कल्पना जगदीश माळी यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात शारीरिक खेळाविषयी शारदा विद्या मंदिर शाळेचे क्रीडा शिक्षक ए पी जाधव व मोबाईल विना जगू या विषयावर शारदा विद्या मंदिराचे उपशिक्षक व्ही बी चौधरी यांनी मार्गदर्शन केले. शिबिराच्या प्रथम दिवशी विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी किट देण्यात आले. तर शिबिराच्या शेवटी चित्रकला व मातीकाम यातील प्रथम तीन विद्यार्थ्यांना रोख स्वरूपात बक्षीस देण्यात आले. यानंतर शामकांत वसंतराव महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षा विद्या वसंतराव महाजन यांनी उन्हाळी शिबिरात मोबाईल विना जगू या, मैदानी खेळाचे महत्व, व्यायामाचे महत्त्व, मातीकाम, टाकाऊ पासून वस्तू बनवणे, प्राचीन संस्कृती, आणि उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग याविषयी माहिती देऊन मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक एस जे पवार यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम ए महाजन यांनी केले व आभार एन पी पाटील यांनी मानलेत. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून

## देशात जातनिहाय...

सरकारने केलेल्या सर्व्हेत पारदर्शकता नव्हती, असे अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आहे. जातीय जनगणना केली पाहिजे, अशी सातत्याने मागणी केली जात होती. त्यामुळे आज कॅबिनेट कमिटी ऑन पॉलिटिकल अफेअर कमिटीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली आणि या बैठकीत जातीय जनगणना होईल, असा निर्णय घेण्यात आला. २०२५-२६ च्या सुरुवातीला देशभरात जातीय जनगणना केली जाईल, असा मोठा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

## राहुल गांधीचे...

हवी आहे. आम्हाला अधिकाऱ्यांची जनगणना नको आहे, अशीही भूमिका त्यांनी मांडली. पुढे बोलताना ते म्हणाले की, जनगणेसाठी आर्थसंकल्पात तरतूद कशी करणार? कोणाची किती भागिदारी असणार हे देखील समजं पाहिजे, तसेच आता आरक्षणातील पन्नास टक्के मर्यादा देखील हटवायला पाहिजे, अशी मोठी मागणी यावेळी राहुल गांधी यांनी केली आहे.

## पक्ष प्रवेशाने 'त्यांचे'...

मी तक्रार केली आहे, त्यामुळे ते अडचणीत आहेत. त्यांनी जी घाण केली आहे ती साफ करण्याकरीता ते जात आहेत. अजितदादा छाती ठोकपणे म्हणतात की, माणसे तपासून घेईल, फार सुंदर माणसे त्यांनी तपासून घेतले आहे. देवकर यांच्या सारखे, असा घणाघात मंत्री गुलाबराव पाटील यांनी केला. अजितदादांना पुढच्या काळात लक्षात येईल की, आपण तपासलेला माणूस हा चुकीचा होता, असे सांगायला ते विसरले नाहीत. गुलाबराव देवकर यांनी आपण घोटाळा केला नाही, असे वक्तव्य केले होते. त्यावर आता सहा महिने का तोंड बंद होते. एकनाथ शिंदे यांना भेटायचे वेळी कुठे झोपलेले होते. माझ्याबरोबर आणि एकनाथ शिंदे यांच्याबरोबर देवकर यांची बैठक झाली असा मोठा खुलासा मंत्री गुलाबराव पाटील यांनी केला आहे. गुलाबराव देवकर यांच्या राष्ट्रवादी अजित पवार गटात होत असलेल्या प्रवेशावरून मंत्री गुलाबराव पाटील यांनी अजितदादा यांच्यावर निशाणा साधला आहे आहे.

## गोळीबार करणारे सहा...

रोजी रात्री फिर्यादी महेद्र समाधान सपकाळे (वय २० वर्षे, रा.प्रबुध्द नगर, पिंप्राळा) हा आपला मित्र भुषण अहिरे याचा वाढदिवस साजरा करण्याकरीता येथे आले होते. यातील फिर्यादी आणि आरोपी यांचे पुर्ववैमनस्य असल्याने इतरांनी हातामध्ये कोयते आणि देशी बनावटीचा गावठी कट्टा घेऊन फिर्यादी यांच्यावर फायरींग करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. हल्ल्यात फिर्यादीच्या पाठीमागील बाजुस कमरेच्या खाली गोळी लागल्याने तो जखमी झाला होता. पोलिसांनी आरोपींचा मागील रेकॉर्ड काढला असता गुन्ह्यातील आरोपी विशाल भिका कोळी याच्यावर शहरात तसेच रामानंदनगर पोलीस स्टेशन अंतर्गत ११ गुन्हे दाखल असून त्याचेवर म.पो.का. कलम ५६ (१) (ब) प्रमाणे तसेच एमपीडीए अंतर्गत प्रतिबंधक कारवाई देखील करण्यात आली आहे. अक्षय उर्फ बाब्या बन्सीलाल धोबी याच्यावर शहर तसेच रामानंदनगर पोलीस स्टेशन अंतर्गत ८ गुन्हे दाखल असून त्याचेवर म.पो.का. कलम ५६ (१) (ब) प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. नितेश उर्फ गोल्या मिलिंद जाधव याचे विरुध्द १५ गुन्हे दाखल असून प्रतिबंधक कारवाई देखील करण्यात आली आहे. संपूर्ण कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली रामानंद नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या पथकातील सपोनि संदीप वाघ, उपनिरीक्षक प्रदीप बोरुडे, संजय सपकाळे, जितेंद्र राजपुत, जितेंद्र राठोड, सुशिल चौधरी, इरफान मलिक, मनोज सुरवाडे, रेवानंद साळुंखे, हेमंत कळसकर, विनोद सुर्यवंशी, उमेश पवार, रविंद्र चौधरी, प्रवीण सुरवाडे यांनी केली आहे.

## तंत्रज्ञानातून...

करावयाचे बदल, फ्रुटिकेअर, प्रकिया उद्योग यासह अन्य प्रश्नांवर शेतकऱ्यांशी फालीच्या विद्यार्थ्यांनी चर्चा केली. पुर्वा खरात, सायली बांगे, जय गवांडे, भक्ती देवकर, पुष्पक शिवांकर, सानिका बोडके या फाली विद्यार्थ्यांनी लीड केले. शेतीतून जास्त उत्पादन वाढीसाठी पाच घटक महत्वाचे आहे. माती, पाणी, सूर्यप्रकाश, कीड नियंत्रण, तण नियंत्रण यावर शेती अवलंबून असते. यातील जमीनीची सुपिकता महत्त्वाची आहे फक्त रासायनिक किंवा जैविक खतांचा वापर न करता त्याचे संतुलन ठेवले पाहिजे. नोकरी पेक्षा शेती तुन जास्त उत्पादन होते. पिकानुसार, आवश्यकतेनुसार खत, पाणी दिले पाहिजे जेणेकरून उत्पादन खर्च कमी होईल परिणामी अधिक नफा होईल. रोहिणी घाडगे यांनी सूत्रसंचालन केले. फाली उपक्रमात दुसऱ्या टप्प्यात ४०० विद्यार्थी व फालीचे शिक्षक सहभागी झाले. पहिल्या दिवशी जैन हिल्स येथील परिश्रम, जैन हिल्स शेती संशोधन प्रात्यक्षिक केंद्र, ड्रीप डेमो, अल्ट्रा हायडेन्सिटी प्लान्ट डेमो प्लॉट, फ्यूचर फार्मिंग, एअर आलू, टिश्यू कल्चर येथे भेट दिली. जगप्रसिद्ध अशा गांधी तीर्थच्या म्युझियमला देखील भेट दिली. त्याचप्रमाणे टिश्युकल्चर पार्क, फळ प्रक्रिया प्रकल्पास भेट देऊन तेथील निर्मितीची प्रक्रिया जाणून घेतली. याच्या यशस्वीतेसाठी जैन इरिगेशनचे अधिकारी, सहकारी तसेच फालीचे हर्ष नौटियाल यांनी परिश्रम घेतले. दुपार सत्राच्या या कार्यक्रमात परिश्रम जैन हिल्स येथे राऊंट राबिन गट चर्चा झाली यामध्ये जैन इरिगेशनचे आंतरराष्ट्रीय केळीतज्ज्ञ डॉ. के.बी. पाटील, डॉ. पंचभाई, डॉ. सुब्रमण्यम, डॉ. कल्याणी मोहरीर हे तसेच संजीव भेस्त (आयटी सी), सचिन शर्मा (प्रोमेप्ट), सनचेत जैन ( अग्रीबाजार), रितेश सुतेरा (प्रोम्पट डेअरी), डॉ. समीर मुधुली, निखील सोनडे (गोदरेज), कपिल रेनवा (स्टार अग्री) त्याच प्रमाणे चोपडा तालुक्यातील धानोरा येथील प्रगतशील शेतकरी अशोक देविदास महाजन, स्वप्नील व्यास (चोपडा) सहभागी झाले होते. फाली-११ मध्ये सहभागी होणाऱ्या शाळांमधील फालीचे विद्यार्थी शालेय स्तरावरील व्यवसाय योजना आणि ॲग्रीटेक इनोव्हेशन स्पर्धांचे विजेते आहेत. हे विद्यार्थी जैन हिल्सच्या आकाश ग्राऊंड कृषी क्षेत्रातील संशोधनाविषयी सादरीकरण करणार आहेत.

## पाकच्या संरक्षण मंत्र्याचा...

मोठं वक्तव्य केलं आहे. 'आम्ही गेल्या ३० वर्षांमध्ये अमेरिकेसाठी अनेक वाईट काम केली' असा मोठा गौप्यस्फोट पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आसिफ ख्वाजा यांनी केला आहे. तर यावर उत्तर देणं अमेरिकेनं टाळलं आहे, यावर भूमिका स्पष्ट करताना आम्ही दोन्ही देशांच्या संपर्कात असल्याचं अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्यानं म्हटलं आहे. दुसरीकडे आम्ही दोन्ही देशांच्या संपर्कात आहोत, आमचे परराष्ट्र मंत्री लवकरच दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी संपर्क साधतील. चर्चेनं या प्रश्नावर तोडगा काढावा, इतर देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी देखील या प्रश्नावर भारत , पाकिस्तानशी बोलावं यासाठी आमचा प्रयत्न सुरू असल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे.

# तलाठी ग्रामसेवक व कृषी कार्यालयात थंब मशीन बसावा



लोकशाही न्यूज नेटवर्क
जामनेर प्रतिनिधी

तलाठी ग्रामसेवक व कृषी कार्यालयात थम मशीन बसवावे. यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभाकर साळवे यांनी जिल्हाधिकारी डॉ. आयुष प्रसाद यांना निवेदन दिले आहे. गाव खेड्यात किंवा तालुका पातळीवर काही ग्रामसेवक तलाठी व कृषी अधिकारी हे वेळेवर हजर राहत नाही. व गावातील मजूर शेतकरी यांना नेहमी या कार्यालयाच्या चकरा माराव्या लागतात. काही विभागाचे परगावी असुन ते ते विभागात हजर सुद्धा राहत नसल्याने शेतकऱ्यांना परतावे लागते. मोबाईल द्वारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता फोन उचलत नाहीत तसेच स्थानिक अधिकारी नसल्याने ते येतात कधी व जातात कधी याचा थांगपत्ता लागत नसुन चुकुन भेट झाली तर व यांना जर कोणी प्रश्न केला तर यांचे एकच उत्तर असते साहेबांनी बोलवलं होतं मिटींग होती. येथे गेलो होतो तिथे गेलो होतो गेलो होतो. या सर्व गोष्टी पासून साधारण जनतेला सुटका मिळावी. त्यासाठी प्रत्येक कार्यालयात थम मशीन बसवावे जेणेकरून शासनाचा घेतल्या जाणारा फुकटाचा पगार वाया जाणार नाही. आणि कामचुकार अधिकारी हे वेळेवर काम करतील आणि एक शिस्तबद्धता यांच्या कामांमध्ये राहील. यासाठी प्रत्येक कार्यालयामध्ये थम्म सिम्बस व्हावे असे दिवेदन डॉ. प्रभाकर साळवे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेला आहे. जर थम मशीन नाही बसवले व काम चुकार अधिकार व कारवाई नाही केली तर राष्ट्रीय समाज पक्षातर्फे मोठे आंदोलन करण्यात येईल असे साळवे यांनी सांगितले.

# ४२ किलो गांजासह एक आरोपी अटकेत



लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव प्रतिनिधी

चाळीसगाव तालुकयात बायपास रोडवर तब्बल साडे चोवीस लाखाहून अधिकची किंमत असलेला ४२ किलो गांजा जप्त केल्याचा प्रकार घडकीस आला आहे. मालेगाव रोडवरील धुळे ते छत्रपती संभाजीनगर बायपास चौफुली येथे वाहनांची तपासणी करत होते. तपासणीदरम्यान, एक पांढऱ्या रंगाची मारुती स्विफ्ट डिझायर (एमएच १२ केएन २३०५) गाडी थांबवून तपासणी केली असता, गाडीच्या डिक्कीमध्ये निळ्या रंगाच्या चार प्लास्टिक पिशव्यात गांजासारखा वास असलेला पदार्थ आढळून आला. सदर माहिती मिळताच पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी हे स्वतः घटनास्थळी दाखल झाले व पुढील कार्यवाहीस सुरुवात केली. फॉरेन्सिक पथक व पंचासमक्ष झालेल्या तपासणीत सदर पदार्थ हा अंमली पदार्थ 'गांजा' असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळीच शेख नदीम शेख बशीर (वय ४० वर्षे, रा. गुलवानी खालदा, गल्ली नं. ३, मालेगाव, जि. नाशिक) याला ताब्यात घेण्यात आले. सदर गांजाचे एकूण वजन ४२ किलो ५८३ ग्रॅम असून, त्याचे अंदाजित बाजारमूल्य रु. २४,६९,१५०/- इतके आहे. तसेच वाहतुकीसाठी वापरलेली गाडी देखील जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी एनडीपीएस कायदा कलम ८(सी), २०(बी), २९ अन्वये चाळीसगाव शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, पुढील तपास सुरु आहे.

# बोराळे येथे मयात गायीचा केला विधीवत अंत्यविधी



लोकशाही न्यूज नेटवर्क
चुंचाळे प्रतिनिधी

यावल तालुक्यातील चुंचाळे गावाच्या शेजारी असलेले बोराळे गावातील आदर्श शेतकरी बलराजसिंग राजपूत यांचे लहान चिरंजीव सुमित राजपूत यांनी गाईला दफन करून विधीवत अंत्यसंस्कार करण्यात आला आहे. बलराजसिंग राजपूत यांच्या मालकीची गाय १८ ते १९ वर्षा पासून ज्यांनी तिचा सांभाळ केला, जिने अनेक वर्ष आईज्या प्रमाणेआपल्या मुलाला दूधाचा बाळ कडू पाजते त्या प्रमाणे या परिवाराला दूध दिलें अश्या परिवाराने गाईची उपकाराची परत फेड म्हणून तिचा विधिवत दफन विधी अंत्यसंस्कार केला आहे, भारतात गायीला राष्ट्रीय पशु गोमाता म्हणून घोषित केले आहे,एवढेच नाहीतर संपूर्ण भारतात गोमाता म्हणून ज्या पशु ची पूजा होते, अशी गौमाता चा आगळा वेगळा दफन विधी बोराळे गावात करण्यात आला आहे, राजपूत यांनी सांगितले कि, महाभयंकर लंम्पि या आजारातून आम्ही या गायीला कित्तेक पैसे लावून वाचवली होती,१९ वर्षा पासून या गायीला आम्ही सांभाळून ठेवले होते आणि आज शेवटच्या क्षणी तिचा अंतिम क्षण जवळ आला म्हणून आम्ही तिला वाळीत न टाकता हा दफनविधी करत आहोत. या वेळेस गावातील किसन सोनवणे, जितू पाटील, प्रदीप वानखेडे, अशोक वानखेडे, दिनकर वानखेडे, सुपडू संदानशिव जेसीबी ड्रायव्हर दिवाकर पाटील सह अनेक गौप्रेमी उपस्थित होते तर यामुळे बोराळे चुंचाळे सह परिसरात या बाबत संस्कारमय वारे वाहत आहे त्यांचे कौतुक केले जात आहे.


**CHANGE IN NAME**

MY OLD NAME IS: SHAIKH AVESH SHAIKH YUSUFBUT I HAVE CHANGED MY NAME
MY NEW NAME IS : AVESH YUSUF BAGWAN
BOTH NAMES ARE FOR THE SAME PERSON.
RAM NAGAR JALGAON 425001



**ग्रामपंचायत जारगाव ता.पाचोरा जि.जळगाव**
**ई- निविदा सुचना क्र.१ सन २०२५/२६ (प्रथम वेळ)**

सरपंच, ग्रामपंचायत जारगाव ता.पाचोरा जि.जळगाव हे जळगाव जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन online percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने १५वा वित्त आयोग अंतर्गत पुढील कामाची ई- निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | बयाना रक्कम रु. (परतावा) | निविदा फी रक्कम रु. | आवश्यक ठेकेदार वर्ग | काम पुर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १५ वा वित्त आयोग अंतर्गत मौजे जारगाव ता.पाचोरा येथे गटार व ढापा बांधकाम करणे. | ४,९९,५४९/- | - | ५००/- | वर्ग ६ व त्यावरील | ६ महिने |
| २. | १५ वा वित्त आयोग अंतर्गत मौजे जारगाव ता.पाचोरा येथे आर.सी.सी. भुमिगत गटार बांधकाम करणे. | २,९६,९१२/- | | | | |
| ३. | १५ वा वित्त आयोग अंतर्गत मौजे जारगाव ता.पाचोरा येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ४,९९,९९८/- | | | | |
| | एकुण | १२,९६,४५९ | | | | |

वरील कामाची निविदा प्रपत्रे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.सदर निविदा प्रपत्रे,अटी,शर्ती इ.सदर संकेतस्थळावर दिनांक ३०/०४/२०२५ रोजी ०९.०० वाजेपासुन दिनांक १४/०५/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यत अधिग्रहीत (Download) करता येतील. व इलेक्ट्रानिक फॉरमॅट मध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर करता येतील.ऑनलाईन सादर केलेल्या ई निविदा दिनांक १५/०५/२०२५ रोजी १७.०० वा.ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.सदर दिवशी ई निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोईनुसार पुढील शक्य त्या दिवशी उघडण्यात येतील.

सरपंच
ग्रा.पं. जारगाव
ता.पाचोरा जि.जळगाव

**लोकशाही**

**संपादकीय**

## राज्यकर्त्यांनीच एक रुपयाची पिक विमा फस्त केली..!




शेतकऱ्यांच्या पिकाला संरक्षण देण्यासाठी शासनातर्फे पिक विमा योजना जाहीर केली होती. तथापि दोन वर्षांपूर्वी एक रुपयात पिक विमा योजना ही गोंडस योजना जाहीर करून शेतकऱ्यांमध्ये लोकप्रियता मिळविण्याचा प्रयत्न केंद्र तसेच महाराष्ट्र शासनाने केला. एक रुपयात पीक विमा योजना म्हणजे शेतकऱ्यांविषयी शासनाला किती कळवळा आहे, असे भासविण्याचा प्रयत्न केला गेला असला, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्याला एक रुपयाच्या पिक विमा काढण्यासाठी मधल्या दलाल लोकांना ३०० ते ४०० रुपये द्यावे लागायचे. त्यामुळे एक रुपयात पीक विमा योजना ही सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी शासनाने जाहीर केलेली योजना होती, हे स्पष्ट आहे. एक प्रकारे या पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रयत्न केला तेव्हा त्यांना सहजासहजी या योजनेचा लाभ विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना दिला नाही. अनेक जाचक अटींमुळे योजनेत त्रुटी दाखवून पिक विमा मिळाल्यापासून शेतकऱ्यांना वंचित ठेवले. जळगाव जिल्ह्यातील अनेक केळी उत्पादक शेतकरी तसेच इतर पिक उत्पादकांना त्याचा लाभ मिळाला नाही. म्हणून जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी केल्या. अखेर अनेक शेतकरी कोर्टातही गेले. परंतु पिक विमा कंपन्यांच्या जाचक अटीमुळे शेतकऱ्यांना पिक विमा मिळू शकला नाही. अनेक खाजगी विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना फायदा मिळवून देण्याऐवजी स्वतःच पैसा कमावला. हा झाला विमा कंपन्यांच्या लुटीचा प्रकार. दुसरीकडे 'जिसकी लाठी उसकी भैस' म्हणतात तशाप्रकारे राजकारणी मंडळींनी मात्र शेतकऱ्यांना पिक विमा मिळवून देण्याच्या नावाने स्वतःच विमा कंपन्यांना लुटले. कोट्यावधींचा भ्रष्टाचार केला. विशेष म्हणजे बीड जिल्ह्यात सर्वाधिक एक रुपयात पिक विमा योजनेच्या नावाखाली ज्यांची शेती नाही त्यांच्याकडे पीक दाखवून त्यांच्या नावावर पिक विमाचे कोट्यावधी रुपये लाटण्याचा आरोप झाला. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्ह्यात सर्वाधिक शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा लाभ तर मिळालाच त्याचबरोबर एक रुपया देऊन पिक विमा योजनेत कोट्यावधींचा भ्रष्टाचार करून शेतकऱ्यांच्या नावाखाली कोट्यावधींचा भ्रष्टाचार करून विमा कंपन्यांना लुटण्याचा प्रकार देखील उघडकीस आला. ज्या लोकप्रतिनिधींकडून शेतकऱ्यांना संरक्षण मिळणे अपेक्षित होते तेथे लोकप्रतिनिधीच शेतकऱ्याच्या नावावर स्वतःची पेटी भरत होते. त्यामुळे प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा हा प्रकार नव्हे काय? एक रुपयातील पिक विमा योजनेत महाराष्ट्रात सर्वत्र भ्रष्टाचार झाला आणि तो लोकप्रतिनिधींनीच केला. सर्वाधिक भ्रष्टाचार महाराष्ट्राची तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या बीडमध्ये झाला आहे, हे स्पष्ट झाले आहे. बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या हृदय द्रावक हत्येनंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी समोर आली. त्यात मंत्री धनंजय मुंडेंना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर त्यांचे अनेक प्रताप उघडकीस आले. सध्याचे महायुतीतील कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचे वक्तव्य पाहता त्यांना कृषी मंत्रीपद का दिले गेले? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

एकंदरीत एक रुपयात पिक विमा योजना गुंडाळण्याचा अर्थात बंद करण्याचा निर्णय काल महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या योजनेतील भ्रष्टाचारामुळे शासनाला हा निर्णय घ्यावा लागला असला, तरी त्याला लोकप्रतिनिधी म्हणजे शासनच जबाबदार आहे, असे म्हणावे लागेल. आता शेतकऱ्यांच्या पिकाला संरक्षण देण्यासाठी नवीन पीक विमा योजना लवकरच जाहीर करण्यात येईल, असाही मंत्रिमंडळात निर्णय घेण्यात आला. आता शेतकऱ्यांसाठी नवीन पीक विमा योजना जाहीर होईल तेव्हा होईल, परंतु कुठलीही शासकीय योजना जनतेच्या हितासाठी राबविण्यात येत असली तरी त्या योजनेतील मलिदा मात्र दुसरेच खातात, हे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे जनतेच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेचा लाभ जनतेला १००% मिळेलच, याची शाश्वती देता येत नाही. लोकप्रतिनिधींसाठी हे एक चराऊ कुरण म्हणता येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकितील सदस्यांपासून ते आमदार, खासदार, मंत्री या लोकप्रतिनिधींचे लोकसेवा व समाजसेवा करीत असताना प्रत्येक पंचवार्षिक निवडणुकीत कोट्यावधीचे उत्पन्न वाढते. हे उत्पन्न येते कुठून? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. समाजसेवेच्या नावाखाली ही मंडळी मेवा खाते. त्यामुळे सध्याचे राजकारण अत्यंत खालच्या थराला जाऊन पोहोचले आहे. सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळला आहे. महायुती शासनातील सत्ताधारी आमदारच गृह खात्यातील भ्रष्टाचारांवर जाहीरपणे टीका करत आहेत. गृह खात्यातील पोलिसांच्या निष्क्रियतेवर बोलले जात आहे. गृह खाते हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असताना ते गप्प बसतात, याचा अर्थ काय घ्यावा? त्यामुळे सर्वसामान्य जनता महागाईमुळे त्रस्त असताना लाखो युवक बेरोजगारीमुळे भयान स्थितीत असताना त्यांच्याकडे शासन म्हणून लक्ष दिले जात नाही. हे दुर्दैवच होय...!

# चले जाव चळवळीतील क्रांतीविरांच्या स्मृती आजही जागृत

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**एम.बी.पाटील — चाळीसगाव**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लाखो लोकांचे योगदान आहे. एकशे सात हुतात्म्यांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्राला मुंबई मिळाली. मात्र, मुंबई सहजासहजी महाराष्ट्राला मिळाली नाही. यासाठी अनेक माध्यमातून निस्वार्थ वृत्तीने जीवाची बाजी लावून प्रपंचाकडे पाठ फिरवत चाळीसगाव तालुक्यातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य संरक्षणार्थ कार्य केले. अशा या चाळीसगाव तालुक्यातील असंख्य ज्ञात अज्ञात स्वातंत्र सैनिक स्वातंत्र्य रक्षकाची ध्येयवादी कार्यकर्त्यांची नोंद इतिहासात होतच असते. चाळीसगाव तालुक्यातील चलेजाव चळवळीत क्रांतिवीराचे नाव आजही अजरामर आहे. . त्यांची नावे पुढीलप्रमाणे. . हरी विनायक पाटसकर, हरी हनुमंतराव चव्हाण, दाजी काशिनाथ भंडारी, सोनूसिंग धनसिंग पाटील, अनंत विनायक बर्गे, रामसिंग भावसिंग घोरपडे, देवराम रामजी पाटील, बाबुराव लक्ष्मण इंदूरकर, जगन्नाथ




हर्षल वाणी, रामदुलारे राम शुक्ल, कौतिक परभत पाटील, काशिनाथ दामू गुंजाळ, भालचंद्र रामचंद्र शुक्ल, सुभान भाई खाटीक, त्र्यंबक गणेश संगीत, बाळकृष्ण गंगाधर कुलकर्णी, केशव हरी चव्हाण, धनराज पाचोरी, रतन विठ्ठल वाघ, मोहन खंडू मराठे, पुंडलिक सोनू गावंडे, ओंकार चंदू सोनार, गिरधर पापा धोबी, आबा मारुती नागणे, दगा वेडू तिरमली, रंगराव गंभीरराव देशमुख, नारायण गोबजी पवार, एकनाथ धनसिंग पाटील, मधुकर त्रंबक ताशे, रूपाली चंदू धोबी, किसनराव सानप, पतंगराव पाटील, बाबूराव दौलतराव पाटील, भीमराव भावराव निकम, रावसाहेब पंढरीनाथ निकम, हिरालाल पिराजी चव्हाण, सुशिलाबाई सुरसिंग पाटील, ठगूबाई हर्षल वाणी, जुलाल वेडू पाटील, नंदू दौलत पाटील, नर्मदाबाई भीमसिंह पाटील, अहिल्याबाई रामदास बाविस्कर, गंगुबाई भाऊराव इंदुरकर, शांताबाई ओंकार येवले, सुंदराबाई भीमसिंह पाटील, जगतसिंग धनसिंग पाटील, लहानुबाई अर्जुन पाटील, भागीरथबाई नारायण निकम, लिलाबाई मोहनसिंग परदेशी, शांताबाई मोतीराम पाटील, शकुंतला दगडू पाटील, शैलजा मधुसूदन घाटे, किसनराव धनाजी पाटील, भास्कर धोंडू कुलकर्णी, चिंधा संपत वेळेस, तुळाजी झगा पाटील, कस्तुरबा रामराव पाटील, बाबूलाल महादू कोळी, बाबुलाल दशरथ पाटील, नथू भिवसन कोळी, जालम दामू पाटील, लिलाबाई नारायण पाटील, सरस्वतीबाई पंडित पाटील.



## भातखंडे येथे श्रीदत्त मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भातखंडे — प्रतिनिधी**

येथील परब्रह्म प्रमेश्वर अवतार भगवान श्री चक्रधर प्रभूच्या कृपेने २८ रोजी सोमवारी नऊ वाजता ध्वजारोहन व मंदिराच्या २० वर्धापना सोहळ्याचे अध्यक्ष प पु, प म मोठे बाबा येळमकर होते. यावेळी अध्यक्षीय भाषणात ज्ञानाची महती, मनाचे शुद्धीकरण अध्यात्मासाठी वेळ काढणे, वृक्षारोपन करुन झाडे लावा झाडे जगवा पर्यावरण संदेश दिले भातखंडे करांनी मंदिराच्या वर्धापनदिनाच्या छान आयोजन केले. येळमकर बाबा आंबेवडगाव यांनी आपल्या वाणीतून भावना व्यक्त केल्या यावेळी पारोळा एरंडोलचे आमदार अमोलदादा पाटील उपस्थीत होते. नाथुबादादा येळमकर, मनोहरबाबा येळमकर निरंजनमुनी लोणाकरदादा शिरसमणी, किर्तनकार भोलेबाबा घुमावलकर उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण पाटील, व आभार आश्रमाच्या संचालीका पू, त सुषमा येळमकर यांनी मानले विनीत प्रसन्नता महानुभाव वसदभक्त भाविक भक्तांनी परिश्रम घेतले.

## डॉ.प्रदिप साखरेंना खान्देश आयकॉन पुरस्कार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**वरणगाव — प्रतिनिधी**

भुसावळ नगरपरिषद संचलित म्युनिसिपल हायस्कूलचे क्रीडा शिक्षक तथा शॉट पीच क्रिकेट फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष डॉ. प्रदीप रवींद्र साखरे यांनी सामाजिक, पर्यावरण, क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रात आजपर्यंतच्या केलेल्या कार्याबद्दल त्यांना जळगांव येथे खान्देश आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी राज्य व राष्ट्रीय पातळीवर केलेले क्रीडा कार्य व आंतरराष्ट्रीय स्तरावर वेतनाम,



थायलंड, चायना, मलेशिया, लावोस, इंडोनेशिया मंगोलिया, नेपाळ, अशा विविध देशांमध्ये एशियन गेम, बीच एशियन गेम, इंडोअर एशियन गेम, वर्ल्ड चॅम्पियनशिप, अशा विविध स्पर्धांमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व तसेच प्रशिक्षित म्हणून काम केलेले आहे. त्यांच्या विविध कार्याची दखल घेऊन सप्तरंग मराठी चैनल व सूर्या फाउंडेशन यांच्या द्वारा व सुप्रसिद्ध मराठी सिनेअभिनेते अभिजीत खांडकेकर, आ. अमोल पाटील– पारोळा–एरंडोल मतदार संघ, आ. राजुमामा भोळे–जळगांव मतदार संघ, ॲड. संजयजी राणे राष्ट्रीय उपाध्यक्ष ऑल इंडिया सिलेवर्कर्स असो. किरण पातोंडेकर, पातोंडेकर ज्वेलर्स, डॉ. मंदार पंडित संचालक पंडित मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, डॉ. अर्चना सुर्यवंशी, सप्तरंग मराठी चैनलचे पंकज कासार यांच्या हस्ते डॉ. प्रदीप साखरे यांना खान्देश आयकॉन पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले.

## ब्राह्मण हितवर्धिनी समितीतर्फे भगवान परशुराम जयंती

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सावदा — प्रतिनिधी**

भगवान परशुराम जयंती सावदा येथील ब्राह्मण हितवर्धिनी समिती तर्फे मोठ्या उत्साहात साजरी केली गेली. विष्णुचा सहावा अवतार मानले गेलेले भगवान परशुराम हे ब्राह्मण समाजाचे नव्हे तर संपूर्ण भारतात अनेक ठिकाणी विशेषतः उत्तर भारतात बहुतांश लोकांचे आराध्य दैवत मानले जाते. दरवर्षी अक्षय तृतीयेच्या दिवशी प्रदोष काळात जयंती साजरी केली जाते. यंदा देखील सावदा येथे ब्राह्मण हितावर्धिनी तर्फे भगवान परशुरामांची दुय्यम निबंधक अधिकारी प्रशांत कुळकर्णी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून प्रसाद वाटप केले



गेले. यावेळी हितवर्धिनीचे अध्यक्ष सचिन सकळकळे यांनी भगवान परशुरामाची मातृ आणि पितृ भक्ती अंगीकारून शिस्त प्रियता पाळणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. तर प्रशांत कुळकर्णी यांनी समाजात आलेली मरगळ दूर सारून जिद्दीने पुढे जाण्याची गरज बोलून दाखविली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रशांत कुळकर्णी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सानिका मटकरी, श्रीकांत मटकरी, प्रदीप कुळकर्णी, निलेश कुळकर्णी, दिपक कुळकर्णी, कविता सकळकळे, अपूर्वा कुळकर्णी, फैजपूर येथील अनिकेत कुळकर्णी, तिवारी, मुन्ना कुळकर्णी, सतीश जोशी, रवींद्र कुळकर्णी यांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने ब्रह्मवृंद उपस्थित होते.

## प्रशांत कुळकर्णींचा सावदा ब्राह्मण समाजातर्फे सत्कार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सावदा — प्रतिनिधी**

जळगाव जिल्हाधिकारी कार्यालया तर्फे सरकार दरबारी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल नुकताच पालक मंत्र्याच्या हस्ते गौरव करण्यात आला, त्यामध्ये सावदा येथील दुय्यम निबंधक अधिकारी प्रशांत कुळकर्णी यांचा देखील पालक मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते सत्कार केला गेला. याचे औचित्य साधून सावदा येथील ब्राह्मण हितवर्धिनी समिती तर्फे अध्यक्ष सचिन सकळकळे यांच्या हस्ते प्रशांत कुळकर्णी



यांचा सत्कार केला गेला. सावदा येथे कार्यरत असलेले प्रशांत कुळकर्णी गेल्या काही वर्षांपासून उत्कृष्ट कामगिरी बजावत आहे. यावेळी समाजाच्या सहकार्यानेच मी आज इथवर यशस्वी रीतीने पोहोचू शकलो, त्यामुळे समाजाच्या कोणत्याही चांगल्या कार्यासाठी सदैव मदतीसाठी तयार असल्याची भावना कुळकर्णी यांनी बोलून दाखविली. यावेळी उपाध्यक्ष प्रदीप कुळकर्णी, कोषाध्यक्ष सानिका मटकरी, श्रीकांत मटकरी, कविता सकळकळे, सचिव रवींद्र कुळकर्णी, अपूर्वा कुळकर्णी, निलेश कुलकर्णी, दिपक कुळकर्णी, धनश्री कुळकर्णी, मुन्ना कुलकर्णी, सतीश जोशी यांच्या सह समाज बांधव उपस्थित होते.

## छत्रपती क्रिडा मंडळाच्या प्रविणला सिल्वर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चंद्रपूर — प्रतिनिधी**

हिमालय प्रदेश येथील शिमला येथे नुकत्याच पार पडलेल्या ४६ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा स्पर्धा २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा राज्य कबड्डी संघातील महावितरण कंपनी हिंगणघाट चे महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ राष्ट्रीय खेडाळू प्रविण वासाडे यांचा संघाने सिल्वर



पदक पटकावले आहे. प्रविन वासाडे महावितरणच्या हिंगणघाट विभागात वरिष्ठ तंत्रज्ञ पदावर कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वीही कबड्डी अनेक पदके पटकावली आहे. यावर्षी अखिल भारतीय विद्युत क्रीडा स्पर्धा शिमला (हिमालय प्रदेश) येथे २७ ते २९ एप्रिल भरविण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत वासाडे यांची आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत आपल्या संघाला विजयाकडे घेऊन जात शिमला संघा सोबत अंतिम लढत झाली. अतिशय अटीतटीच्या झालेल्या लढतीत वासाडे यांनी सिल्वर पदकावर आपले व राज्याचा कबड्डी खेळाडूंचे नाव कोरले. त्यांच्या या यशाबद्दल मंडळाचे अध्यक्ष अफजल भाई, सहसचिव शंकर बोरघरे, कोषाध्यक्ष जितेंद्र माहुरे, सदस्य शाम चटपल्लीवार, मंडळाचे जेष्ठ नामवंत खेळाडू सुरज पाशी, सागर मोरे, राष्ट्रीय खेळाडू धीरज पाशी, खेडाळू अजय पाडवार क्रीडा प्रेमी आदिंनी अभिनंदन केले.

## वृद्धाची गळफास घेत आत्महत्या

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा — प्रतिनिधी**

शहरातील मानसिंगका कॉलनीतील एका ६३ वर्षीय वृद्धाने आपल्या राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना ३० एप्रिल रोजी अक्षय तृतीयेच्या दिवशी घडली आहे. घटनेप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पाचोरा शहरातील मानसिंगका कॉलनीतील रहिवाशी भरत नारायण पाटील (वय – ६३ वर्ष) या वृद्धाने आपल्या राहत्या घरात गळफास लावून आपली जीवनयात्रा संपविल्याची घटना घडली आहे. सदरचा प्रकार मयत वृद्धाच्या मुलाच्या लक्षात येताच त्याने हंबरडा फोडला. घटनास्थळी पोलिस पथक दाखल होवुन घटनास्थळाचा पंचनामा करून भरत पाटील यांना तात्काळ रुग्णवाहिका चालक किशोर लोहार यांच्या मदतीने पाचोरा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले. घटनेप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. भरत पाटील यांनी आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल का उचलले ? याचा शोध पाचोरा पोलिस घेत आहेत.

# अप्पासाहेब म्हसावदकर स्मृती मानांकन व निवड कॅरम स्पर्धा

**नईम अन्सारी विजेता तर रईस शेख उपविजेता : जळगाव जिल्हा हौशी कॅरम संघटना द्वारे आयोजन**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव — प्रतिनिधी**

जळगाव जिल्हा कॅरम असो. च्या मान्यतेने व जैन स्पोर्टस् अकॅडमीच्या सहकार्याने जळगाव जिल्हा हौशी कॅरम संघटना द्वारे आयोजित ७व्या कै. अप्पासाहेब म्हसावदकर स्मृती जळगाव जिल्हा मानांकन व निवड कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात जैन इरिगेशनच्या नईम अन्सारी याने तमन्ना क्रीडा संस्था, तांबापुर च्या रईस शेख याचा २० सेटने पराभव करून विजेतेपदासह रोख रुपये ५००१/ व चषक पारितोषिक स्वरूपात प्राप्त केले. रईस शेख यास रोख रुपये ३००१/ व चषक बक्षिस मिळाले. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक रोशन शेख रोख रुपये २००१/ व चषक आणि चतुर्थ रोख रुपये १५०१/ व चषक अय्यूब खान याने प्राप्त केले. क्रमांक ५ ते ८ चे प्रत्येकी रोख रुपये १००१/ चे पारितोषिक अनुक्रमे आवेज शेख ( प्लाझा क्रीडा संस्था), शेख हबीब ( एकता क्रीडा मंडळ), सैय्यद मुबश्शीर ( प्लाझा) व सैय्यद मोहसिन ( जैन स्पोर्टस् अकॅडमी ) यांनी प्राप्त केले. स्पर्धेतील एकमेव ओपन टू फिनिश ची नोंद जैन स्पोर्टस् अकॅडमीच्या परेश देशपांडे यांनी केली. बक्षिस



वितरण कार्यक्रमा करिता सर्वश्री ॲड. रविंद्र कुलकर्णी, युसूफ भाई मकरा, सुयश बुरकुल, रोहित श्याम कोगटा, शरीफ खान व इतर मान्यवर उपस्थितीत होते. पाहुण्यांचे स्वागत सर्वश्री सैय्यद मोहसिन, शेख हबीब, मोहम्मद फजल, नासिर खान व आताऊल्लाह खान यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रमुख पाहुण्यांचे आभार महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष मंजूर खान यांनी केले. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून आयशा खान, चंद्रशेखर नरवरिया आणि सरफराजुल हक यांनी परिश्रम घेतले. स्पर्धेत जळगाव जिल्हाभरातून एकूण ४८ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या प्रसंगी नुकताच २०२३२४ सालाकरिता जैन इरिगेशनच्या आंतरराष्ट्रीय कॅरम खेळाडू योगेश धोंगडे यास महाराष्ट्र सरकार तर्फे श्री शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( कॅरम खेळाडू) म्हणून प्राप्त झाले. त्या बद्दल त्यांचे विशेष सत्कार सर्व प्रमुख पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. स्पर्धेतील अंतिम निकाल विजेता : नईम अन्सारी ( जैन इरिगेशन), उपविजेता रईस शेख ( तमन्ना क्रीडा संस्था, तांबापुर), ३ रा क्रमांक रोशन शेख (तमन्ना क्रीडा संस्था, तांबापुर), ४था क्रमांक अय्यूब खान ( तमन्ना क्रीडा संस्था, तांबापुर), ५वा क्रमांक आवेज शेख (प्लाझा क्रीडा संस्था), ६ वा क्रमांक हबीब शेख (एकता क्रीडा मंडळ), ७ वा क्रमांक सैय्यद मुबश्शीर (प्लाझा क्रीडा संस्था), ८ वा क्रमांक सैय्यद मोहसिन (जैन स्पोर्टस अकॅडमी).






# मानसिक आरोग्याची गुरुकिल्ली

संत तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे. मन करा रे प्रसन्न,सर्व सिद्धी-चे कारण अर्थात आपलं मन जर प्रसन्न,आनंदी असेल तर सर्व गोष्टी व्यवस्थित होतात. परंतु होत काय कि, आपण जीवन जगत असताना आपल्या प्रत्येकाला अनेकदा बऱ्या वाईट अनुभवांना सामोरं जावं लागत. अनेक प्रकारचे ताण तणाव आपल्याला असतात. आपली जीवनशैली देखील अत्यंत धकाधकीची आणि तणावयुक्त बनलेली आहे. याचा दुष्परिणाम हा आपल्या मनावर होत असतो. अर्थात, आपल्याला ताप,सर्दी,पडसे असे जे शारीरिक आजार होतात तसेच मनावरचा ताण जर वाढला तर अनेकदा अनेक प्रकारच्या मानसिक आजाराच्या समस्या उद्भवतात.,आणि मनुष्य मनोविकारी बनू शकतो.म्हणूनच आपण प्रत्येकाने आपलं मानसिक आरोग्य जपणं,सुधृढ ठेवणं अत्यंत गरजेचं आहे. मुळात मानसिक आरोग्य म्हणजे काय?आणि मानसिक आरोग्य सुधृढ ठेवण्याची गुरुकिल्ली नेमकी कोणती?हेच जाणून घेण्यासाठी नागपूरच्या प्रादेशिक मनोरुग्णालयात मानसोपचारतज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. दीपक अवचट यांच्याशी केलेली बातचीत.

**१मानसिक आरोग्य म्हणजे नेमकं काय?**

मानसिक आरोग्य म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी अगोदर आपण आरोग्य म्हणजे काय हे समजून घेणं महत्वाचं आहे. मानवी शरीर आहे या शरीराच्या काही गरज आहेत. आपण रोज आहार घेतो,व्यायाम करतो,आपलं मन आनंदी ठेवण्यासाठी मनोरंजनात आपलं मन गुंतवतो,एकमेकांशी संवाद साधतो या सर्व गोष्टीमुळे आपलं शारीरिक आरोग्य सुधृढ राहण्यास मदत होते. परंतु जस शारीरिक आरोग्य असत तसेच मानसिक आणि सामाजिक आरोग्य देखील असत. आपल्याला ताप,सर्दी,खोकला झाला किंवा पायाला हाताला इजा झाली,पोटात काही गडबड असेल तर आपलं शारीरिक आरोग्य बिघडलं असं आपण म्हणतो परंतु काही कारणामुळे




आपल्याला जर मानसिक तणाव आला,जीवनात खूप नैराश्य आलं तर त्याचा आपल्या मनावर जो परिणाम होतो त्याला मानसिक आजार म्हणतात. अर्थात मानसिक आजार हे मानसिक आरोग्य बिघडवतात.

**२ एखाद्या व्यक्तीच मानसिक आरोग्य उत्तम आहे हे कस ओळखायचं?**

सर्वसाधारण माणसं हि आनंदाने आपलं आयुष्य जगत असतात. त्यांची विचारधारा हि सशक्त असते आणि विचार देखील सकारात्मक असतात. जीवनातील छोट्यामोठ्या समस्यांचा सामना करण्याची आणि त्या समस्यांवर तोडगा काढण्याची त्यांची क्षमता असते, असे लोक मानसिक दृष्ट्या सक्षम असतात.परंतु एखादी व्यक्ती अनेक दिवस उदास असेल, एकटीच बडबडत असेल,चारचौघांमध्ये मिसळत नसेल,अशा व्यक्तीला झोप येत नसेल ,काही भास होत असतील तर अशा व्यक्तीची मानसिक स्थिती बिघडलेली आहे असं म्हणता येईल. अनेकदा हि अवस्था जर अनेक आठवडे राहिली तर प्रचंड नैराश्य येऊन अशा व्यक्तीला मानसिक विकार देखील जडतात. मानसिक आजार हे ओळखता येत नाहीत ते समजून घेणं महत्वाचं असत.

**३मानसिक आजाराचे प्रकार कोणते आहेत?**

मानसिक आरोग्य आणि मानसिक आजार या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एखादा मनुष्य सर्वसाधारण असतो जो जीवनातील समस्यांचा सामना करू शकतो त्याच मानसिक आरोग्य हे उत्तम आहे असं म्हणता येईल. परंतु एखादी व्यक्ती हि काही दिवसापेक्षा अनेक दिवस जर नैराश्यात असेल, त्याच्या मनात सातत्याने नकारात्मक विचार नयेत असतील,त्याला इतरांशी बोलावंस वाटत नसेल,चारचौघात मिसळावं असं वाटत नसेल तर ती व्यक्ती मानसिक दृष्टया आजारी असते. मनाचे स्क्रिझोफिनिया,डिफेंशिया,बायपोला डिसऑर्डर,डिप्रेशन असे अनेक आजार आहेत. या पैकी स्किझोफोर्निया मध्ये एखाद्या व्यक्तीला लोक आपल्याबद्दल बोलतायत,कुजबुज करतायत,आपल्याला हसतायत असे भास होतात हि गोष्ट सहा महिने असेल तर तो स्क्रिझोफोर्निया आहे असं म्हणता येईल. एखाद्या मोठ्या आघातामुळे किंवा मनावर सातत्याने येणाऱ्या तणावामुळे मनुष्य एकांतात जातो,खूप एकटा वागतो,त्याला कसलीच इच्छा होत नाही ते नैराश्य असते.

**४आपलं मानसिक आरोग्य सुधृढ राखण्यासाठी उपाय काय आहेत?**

आपल्या मनाच आरोग्य चांगलं,स्वस्थ राखण हि अगदी सोपी गोष्ट आहे त्यासाठी फार काही वेगळं करणं गरजेचं नाही. आपला आहार आपण वेळेवर घेणं आणि आपल्या आहारात शरीरासाठी पोषक सर्व घटकांचा समावेश असेल असा आहार घेणं महत्वाचं आहे. शिवाय रोजच्या रोज व्यायाम करणं,वाचन,संगीत ऐकणं,किंवा असाच एखादा मनाला विरंगुळा मिळेल असा छंद जोपासणं महत्वाचं असत. समाजातील इतर लोकांमध्ये मिसळणं,आपल्या मित्रांचा एक ग्रुप करून त्यांच्याशी संवाद साधन,व्यक्त होणं आपल्या समस्या शेअर करणं हे मनाच्या आरोग्यसाठी खूप महत्वाचं आहे. मानसिक लवचिकता वाढवणं देखील तितकच महत्वाचं आहे. सतत सकारात्मक वृत्तीने जगता आलं पाहिजे. अशा गोष्टीमुळे मन प्रसन्न राहत आणि मानसिक आजारांचा त्रास न होता आपलं मानसिक आरोग्य सुधृढ राहत.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल - subodh.ranshevre@rediffmail.com

# कर्करोग उपचारात ॲबव्ही ने व्हेनेटोक्लॅक्स च्या माध्यमातून भारतात वाढवली व्याप्ती

ॲक्युट मायलॉइड ल्युकेमिया (एएमएल) या दुर्मिळ आणि गतिशील रक्त कर्करोगाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठीच्या जागतिक मोहिमेअंतर्गत आज जागतिक एएमएल जागरूकता दिन साजरा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर,परिवर्तन घडवणारी औषधे निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या जागतिक बायोफार्मास्युटिकल क्षेत्रातील आघाडीची कंपनी ॲबव्ही ने भारतात कर्करोग उपचार क्षेत्रात पदार्पण करण्याची घोषणा केली आहे. कंपनीने ॲक्युट




मायलॉइड ल्युकेमिया आणि क्रॉनिक लिम्फोसाइटिक ल्युकेमिया या दोन्ही प्रकारच्या कर्करोगांवर उपचारासाठी व्हेनेटोक्लॅक्स हे औषध तयार केले आहे. कर्करोगाविरुद्धच्या भारताच्या लढाईत आवश्यक असलेल्या वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी आणि रुग्णांच्या जीवनात सुधारणा घडवण्यासाठीच्या ॲबव्ही च्या समर्पण भावनेचे हे महत्त्वपूर्ण पाऊल प्रतीक आहे.

ॲक्युट मायलॉइड ल्युकेमिया हा एक वेगाने पसरणारा रक्त आणि अस्थिमज्जाचा कर्करोग आहे. यात उपचार पर्याय मर्यादित असतात आणि रुग्णांच्या जगण्याची शक्यता कमी असते. व्हेनेटोक्लॅक्स हे बीसीएल-२ इनहिबिटर औषधांच्या श्रेणीतील पहिले औषध आहे. हे रक्त आणि अस्थिमज्जातील कर्करोगाच्या पेशींना निवडकपणे लक्ष्य करून एक नवीन उपचार पद्धती देते. विशेषतः वय किंवा इतर आरोग्य समस्यांमुळे पारंपरिक तीव्र केमोथेरपी घेऊ शकत नसलेल्या रुग्णांसाठी हे आशेचा किरण ठरते. नवी दिल्लीच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या ()अलीकडील आकडेवारीनुसार,भारतात एएमएलचे प्रमाणदर१,००,०००लोकसंख्येमध्ये २.५ रुग्ण इतके आहे. एएमएल असलेल्या रुग्णांसाठी,विशेषत: जे तीव्र केमोथेरपीसाठी सक्षम नाहीत,त्यांच्यासाठी उपचाराच्या अधिक संधी उपलब्ध करण्याची तीव्र गरज दिसून येते.

# पईच्या बियांचे फायदे

पपईच्या बिया केवळ आरोग्यासाठीच नाही तर त्वचेसाठीही फायदेशीर असतात. त्यांचे मर्यादित प्रमाणात सेवन केल्याने आपले आरोग्य चांगले राहते शिवाय सौंदर्यातही भर पडते. पपई आपल्या आरोग्यासाठी किती चांगली असते. पपई खाण्याचे अनेक फायदे असतात. पण तुम्हाला कदाचित हे माहित नसेल की पपईच्या बियासुद्धा तेवढ्याच आरोग्यवर्धक असतात. पपईमध्ये औषधी गुणधर्म असतात ज्यामुळे आपल्या शरीरातील असंख्य समस्या मुळापासून नष्ट होण्यासाठी मदत करतात.ज्या व्यक्तींना आपले वजन कमी करायचे आहे अशा व्यक्तींना पपईसोबतच पपईच्या बियांचाही वापर केला जातो. आपण या बियांना सुकवून ठेवू शकतो



आणि त्याची पावडर बनवून सुद्धा विविध पदार्थांसोबत त्याचे सेवन करू शकतो.ज्या व्यक्तींना शुगरची समस्या आहे, तसेच पचनासंबंधीची समस्या असेल यावर सुद्धा या बिया अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्याचबरोबर पपईच्या बिया शरीरामध्ये कॅन्सर पेशींची वाढ होण्यापासून सुद्धा रोखतात.ज्यांना पचनासंबधी किंवा बद्धकोष्ठताची समस्या असेल. त्यांच्यासाठी तर पपईच्या बिया या रामबाण उपाय असतात. तीन ते चार बियांचे सेवन केल्यास तर बद्धकोष्टतेची समस्या लवकरच दूर होते. जर एखाद्या व्यक्तीला चिकनगुनिया, मलेरिया, डेंगू यासारखे आजार झाले असतील तर अशा वेळीसुद्धा पपई खाण्याचा सल्ला दिला जातो व त्याचबरोबर पपईच्या पानांचा रस प्यायल्याने व्यक्तीच्या शरीरातील प्लेटलेट्सची संख्या वाढण्यास मदत होते.तसेच जर तुमचे पोट साफ होत नसेल, पोटामध्ये गॅस निर्माण झाला असेल तर कच्च्या पपईची भाजी सुद्धा बनवून तुम्ही खाऊ शकता किंवा पपईच्या बियांचेही सेवन करू शकता. सौंदर्यप्रसाधने मध्ये सुद्धा पपईचा खूप मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

# छत्रपती क्रिडा मंडळाचा स्नेहमिलन सोहळा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चंद्रपूर** प्रतिनिधी

जिल्हातील एक नामवंत कबड्डी मंडळ म्हणून छत्रपती क्रिडा मंडळ असून यांचे सरावाकरीता लोकसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत गुंडावार यांनी बहुमोल सहकार्यांनी कबड्डी सरावा करीता लोकमान्य विद्यालय भद्रावती चे पटांगण खेळाडूंना उपलब्ध करुन दीले. तसेच विद्यालयाचे प्राचार्य सचिन सरपटवार सर, उपप्राचार्य रूपचंद धारणे सर यांचे मुख्य मार्गदर्शन कबड्डी मंडळाचा संचालक मंडळींना लाभतो



सदर मंडळातील खेळाडू जास्तीत जास्त संख्येत शासकीय सेवेतील काम करीत असून सोहळ्याचे उद्देश खेळाडू आणि क्रिडाप्रमींना एकत्र आणणारे क्रिडा संस्कृतीला प्रोत्साहन देणे, मंडळाचा कार्याची माहीती देणे, खेळाडूंना प्रोत्साहन देणे, सामाजिक सबंध दृढ करणे. मंडळाचा संचालक यांचे आग्रहास्तव भद्रावती चे कर्तव्यदक्ष तहसीलदार राजेश भांडारकर यांनी स्नेहमिलन सोहळ्यात मुख्य उपस्थित राहुन आयोजित कार्यक्रला आलेल्या क्रिडा प्रेमींचा व खेळाडूंचा आनंद व्दिगुनीत केला. या प्रसंगी तहसीलदार राजेश भांडारकर यांचा हस्ते मैदानात असलेल्या मंदिरातील भगवान हनुमानजीची आरती करण्यात आली. सिंदूर, फुल, प्रसाद अर्पण करून महाप्रसादाला सुरूवात झाली. यावेळी कबड्डी मंडळाचे अध्यक्ष अफजल भाई, सहसचिव शंकर बोरघरे, कोषाध्यक्ष जितेंद्र माहूरे, सदस्य शाम चटपल्लीवार, मंडळाचे जेष्ठ नामवंत खेळाडू सुरज पाशी, सागर मोरे, राष्ट्रीय खेळाडु धिरज पाशी, खेडाळू अजय पाडवार, द्रोणाचार्य खो -खो मंडळाचे सचिव संतोष निंबाळकर आदी खेळाडू क्रिडा प्रेमी उपस्थित होते.

# पारोळ्यात महाराष्ट्र मंगल कलश यात्रेचे स्वागत

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने आयोजित मंगल कलश रथयात्रा दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी मुक्ताईनगर येथून भव्य आणि दिव्य स्वरुपात प्रारंभ झाली. ही यात्रा पक्षाच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय बांधिलकीचे प्रत्यक्ष दर्शन घडवत आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचा अभिमान बाळगून, विविध गावागावातून जनतेपर्यंत पोहोचण्याचा उद्देश या यात्रेमागे आहे. भव्य सहभाग व संघटनेची सुसंगत ताकद- ह्या यात्रेत डॉ संभाजीराजे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पारोळा तालुक्यातील विविध पदाधिकाऱ्यांचा आणि कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग पाहायला मिळाला. यावेळी मंगल कलश रथ यात्रेची मिरवणुकीची सुरुवात



पारोळा बायपास येथुन डि. जे. व ढोल ताशांच्या गजरात पारोळ्यात श्री साई हॉस्पिटल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय येथे पोहचली. मा. मदत, पुनर्वसन मंत्री व आपत्ती व्यवस्थापन मंत्री, अमळनेर विधानसभेचे विद्यमान आमदार अनिल भाईदास पाटील, जिल्हाध्यक्ष संजय पवार, जिल्हा कार्याध्यक्ष योगेश देसले, रावेर ग्रामीण कार्याध्यक्ष रविंद्र पाटील, उत्तर महाराष्ट्र युवती काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभिलाषा रोकडे, सह जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते सदस्य सहभागी होते. संघटनेचा उद्देश आणि दृष्टीकोन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नेहमीच समाजाच्या सर्व घटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक विकासाचा मार्ग अवलंबला आहे. महाराष्ट्राची एकता व अखंडतेचा सन्मान, सर्व जाती, धर्म, पंथांना समान वागणूक देणे, जनतेच्या प्रश्नांशी बांधिलकी जपणे, ग्रामीण व शहरी भागात संवाद व विश्वास वाढवणे, संघटनात्मक बळकटता साधणे आणि नवचैतन्य निर्माण करणे. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना ठाम विश्वास व्यक्त केला की ''ही यात्रा केवळ धार्मिक वा राजकीय कार्यक्रम नसून, ती महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रतिक आहे. उत्तर महाराष्ट्रात नवसंजीवनी फुंकणारी ही यात्रा जनतेच्या मनात राष्ट्रवादी काँग्रेसबद्दल नव्या विश्वासाचा संचार करेल, '' असा ठाम विश्वास डॉ संभाजीराजे पाटील यांच्या वतीने नागरिकांना व पदाधिकाऱ्यांना देण्यात आला.

# सर्व वेदांचा सार म्हणजे भागवत..!

**हरिपाठ चिंतन : भाग २०**

**अनन्तशास्त्रं बहुलाश्च विद्या:**
**अल्पश्च कालो बहुविघ्नता च।**
**यत्सारभूतं तदुपासनीयं हंसो**
**यथा क्षीरमिवाम्बुमध्यात।।**
**।।चाणक्य नीति।।१५-१०।।**

शास्त्रे अनंत आहेत, विद्या खूप आहेत, परंतु, आपल्याकडे वेळ आयुष्य थोडा आहे, अशा वेळी जसा राजहंस दूध आणि पाणी वेग-वेगळे करतो, व फक्त सार दूध घेतो. त्याचप्रमाणे संतांना हंसाची, परमहंसाची उपमा दिली आहे. या जगात सार काय असार काय हे सर्व शास्त्रांतून ते निवडून काढतात व ज्यात आपले शाश्वत-चिरंतन कल्याण आहे, तेच आपल्याला निवडून देतात। सर्व सार आहे-''ईश्वराचे ध्यान करणे, ईश्वर भक्ती करणे, ईश्वराला अनन्य भावाने शरण जाणे.


**आलोड्य सर्व शास्त्राणि विचार्य च पुन: पुन:।**
**इदमेकं सुनिष्पन्नं ध्येयो नारायणो हरि:।।**
**।। शुकाचार्य पुराण।।**

सर्व शास्त्रांचा पुन्हा पुन्हा अभ्यास व चिंतन केले असता एकच निष्पन्न होते कि, नारायणाचे, ईश्वराचे ध्यान करावे.

**तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राम्हण:।**
**नानुध्यायान् बहून् शब्दान् वाचो विग्लापनं हि तत।।**
**।। बृहदारण्यक-उपनिषद।।**

अनेक शास्त्रांचे वाचन करण्याची गरज नाही, तो एक वाणीचा अभ्यास आहे. वाणीचा विलास आहे. शास्त्रांचा सार एवढाच आहे कि, त्या परम तत्वाला, ईश्वराला जाणुन घेऊन त्याचेच ठिकाणी लक्ष्य लावावे। त्याचे ध्यान, चिंतन करावे। इतर फक्त वाणी ची बडबड आहे. सर्ववेदांतसारं हि श्रीभागवतमिष्यते। तद्रसामृततृप्तस्य नान्यत्र स्याद्रति: क्वचित।।-(श्रीमद् भागवत-१२-१३-१५) सर्व वेदांचा सार म्हणजे भागवत, यात जो तृप्त झाला त्याला इतरत्र गोडी वाटणार नाही. तसेच भगवद्गीता सर्व वेदांचा सार आहे असे महर्षि व्यासांनीच म्हटले आहे. त्यामुळेच तुकाराम महाराजांच्या अभंगात नेहमी गीता व भागवत यांचा उल्लेख असतो।

**''गीता भागवत करिती श्रवण।**
**अखंड चिंतन विठोबाचे।।१।।''**
**''अर्जुना वेदविद जरी जहला**
**। परि माते नेणता वाया गेला।**




**कण सांडोनि उपणीला कोंडा जैसा।।**
**।।ज्ञानेश्वरी।।''**

वेदांचा कितीही अभ्यास केला, वेदविद्या पारंगत झाला तरी परमेश्वराला जाणले नाही तर त्याचे वेद ज्ञान, धान्य पाखडतांना धान्याचे कण, दाणे सोडून कोंडा उपनावा, धान्य सोडून कोंडाच घेतला असे होईल. असे भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. अनेक ग्रंथ, अनेक शास्त्रे आहेत, किती वाचणार? तुकाराम महराज म्हणतात, इतके ग्रंथ आहेत कि ते वाचायला आपले आयुष्य देखील पुरणार नाही, वाचल्यावर ते समजतीलच इतकी प्रखर बुध्दी प्रत्येककडे नाही.

**''पाहो ग्रंथ तरी आयुष्य नाही हातीं।**
**नाही ऐशी मती अर्थ कळे।।१।।**
**होईल ते हो या विठोबाच्या नावे।**
**अर्जिले ते भावे जीवी धरु।।२।।**
**एखादा अंगासी येईल प्रकार।**
**विचारिता फार युक्ती वाढे।।३।।**
**तुका म्हणे आळी करिता गोमटी।**
**मायबापा पोटी येते दया।।४।। २१९६**

अनेक ग्रंथ पाहवयास पुष्कळ आयुष्य पाहिजे, पण ते तर आपल्या स्वाधीन नाही, व त्या ग्रंथार्थांचे ज्ञान होईल अशा तीव्र बुध्दीची अनुकूलताही नाही।।१।। विठोबाचे नाम घेण्याने जे होणार असेल ते होवो। जे साधन मिळविले आहे तेच मनोभावाने जीवी धरुन राहू।।२।। विचार करावयास गेले तर अनेक प्रकारच्या कुतर्क युक्ती वाढून एखादा जाणतेपणाचा (अभिमानाचा) भाव आपणाकडे येईल।।३।। तुकाराम महाराज म्हणतात, बालकाने चांगला छंद घेतला तर त्याचा तो पुरविण्याविषयी आईबापांच्या मनात दया येते।(त्याप्रमाणे निष्ठेने हरीचे नाम घेतले तर हरीला त्या भक्ताची करुणा येऊन तो त्याचा उध्दार करील)।।४।। पे-४६२।।

क्रमशः



डॉ. गोरखनाथ सुकदेव देवरे
रिटायर्ड मेडीकल ऑफिसर नांदगाव,
जि. नाशिक मो.९८२२४२८५७२

## भालोद येथे आज खंडेरायाच्या बारागाड्यांचा उत्सव

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भालोद ता. यावल** प्रतिनिधी

गावातील परंपरेनुसार अक्षय तृतीयेच्या दुसऱ्या दिवशी खंडेरायाच्या बारागाड्या ओढण्याची प्रथा वंशपरंपरेनुसार सुरु आहे. सुरुवातीपासून बारागाडया ओढण्याची प्रथा कोळी घराण्याकडे आहे. परिसरातील व गावातील लोक बारागाड्या बघण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात. सचिन निळकंठ कोळी हा बारागाडया ओढणार आहे. भगता सोबत प्रल्हाद कोळी, अशोक कोळी, निळकंठ कोळी, भास्कर कोळी, नथु कोळी, रघुनाथ कोळी, सुभाष कोळी, तुषार कोळी, अर्जुन कोळी, सुनिल कोळी, कैलास कोळी, रविंद्र कोळी, राजू कोळी, सामाजिक कार्यकर्ते जितू कोळी, रमण कोळी, अमोल कोळी, सुनिल मधुकर कोळी, विशाल कोळी, नितिन कोळी, राकेश कोळी, **(पान २ वर)**

## महत्वाचे

### शिरागडला हरीनाम संकीर्तन सप्ताह

**मनवेल ता.यावल–** येथून जवळच असलेल्या शिरागड येथे पांडुरगांच्या कृपेने व वैकुंठवाशी हभप नामदेव महाराज शिरागडकर यांच्या कृपा आर्शिवादाने ७३ वर्षापासून सुरू असलेल्या अंखड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे आयोजन २ मे २०२५ रोज शुक्रवार पासून आयोजन करण्यात आले असून ९ मे रोजी सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. या सप्ताहात सकाळी ५ ते ६ काकडा आरती सांयकाळी ५ ते ६ हरिपाठ रात्री ८ ते १० कीर्तन होणार आहे. या सप्ताहात नारायण महाराज मनवेलकर, काशीनाथ महाराज कोळन्हावीकर, रमेश महाराज सुसरीकर, योगेश महाराज चिचोलीकर, चंद्रकात महाराज भुसावळकर, सुर्यभान महाराज शेळगावकर, दिपक महाराज बोराजंटीकर यांचे कीर्तन होणार असून हभप पांडुरंग महाराज कानळदाकर यांचा काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. भावीकानी कार्यक्रमाच्या लाभ घ्यावा, असे आवाहन हभप भजनी मंडळ व शिरागड ग्रामस्थ यांनी केले आहे.

### रावसाहेब दानवेंच्या कारला अपघात

**पुणे –** लोणावळ्यातील जयचंद चौकामध्ये रावसाहेब दानवे यांचा भीषण अपघात झाला आहे. त्यांच्या कारला एका दुचाकीने जोरदार धडक दिली आहे. या अपघातानंतर दुचाकीस्वाराने रावसाहेब दानवे यांच्याशी हुज्जत घालायला सुरुवात केली. या अपघातामुळे लोणावळा बाजारपेठ येथील सीसीटीव्हीचा भोंगळ कारभार समोर आला आहे. रावसाहेब दानवे हे कामासाठी लोणावळ्यातील बाजारपेठेत आले होते. त्यावेळी एक दुचाकीने रावसाहेब दानवे यांच्या आर्टिका गाडीला धडक दिली. यात दुचाकीस्वाराच्या गाडीचे मोठे नुकसान झाले. या अपघातानंतर मोटारसायकल स्वाराने रावसाहेब दानवे यांच्याशी हुज्जत घालायला सुरुवात केली. यानंतर स्थानिक रिक्षाचालकांनी मध्यस्थी करून वाद मिटवला. तसेच रावसाहेब दानवेही त्या ठिकाणी उपस्थित होते. मात्र या अपघातामुळे लोणावळा बाजारपेठ येथील सीसीटीव्ही यंत्रणा ठप्प असल्याचं दिसून आले. तसेच पोलिसांचा ससेमिरा मागे नकोय यासाठी स्थानिक दुकानदारांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. मात्र ते स्वतःच्या दुकानापुरते ठेवले आहेत, तर पोलीस यंत्रणेने बसविलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याचं निर्दशनास आले. यामुळे स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

### दोन ट्रकची भीषण धडक

**मुंबई –** मुंबई–गोवा महामार्गावर दोन ट्रकच्या समोरासमोर झालेल्या भीषण अपघातात एक चालक जखमी झाला आहे. अपघातामुळे महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. जखमी चालकावर तातडीने उपचार सुरू आहेत. मुंबई–गोवा महामार्गावर नागोठणे जवळ हा भीषण अपघात झाला. अपघातात दोन ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने एका ट्रेलरचा चालक जखमी झाला आहे.

# अनुभूती निवासी स्कूलचा सलग १८ व्यावर्षी १०० टक्के निकाल

## सीआयएससीई बोर्डच्या निकालात १२ वीत क्रिषा राठोड तर १० वीत वेद भुसकाडे प्रथम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी



कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनिशन्सचे (सीआयएससीई) च्या दहावी व बारावी निकाल जाहिर करण्यात आले. त्यात अनुभूती निवासी स्कूलच्या स्थापनेपासून (२००७ पासून) ते आतापर्यंत १०० टक्के निकालाची परंपरा यावर्षीसुद्धा कायम राहिली आहे. इयत्ता १२ वीत क्रिषा राठोड तर दहावीत वेद जयंत भुसकाडे प्रथम आले आहेत. दिल्ली सीआयएससीई बोर्डच्या इयत्ता १२ वी आयएससीचा निकालात घवघवीत यश संपादित केले. क्रिषा राठोड हा ९५.०० टक्के गुणांसह पहिली आली आहे. तर आरोही रघुनाथ परांजपे ९३.२५ टक्के गुणांसह द्वितीय तर शाल्मली शैलेंद्र अलमन ९२.२५ तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. यामध्ये ९० टक्यांच्यावर सहा तर ८० ते ९० टक्क्यांमध्ये तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आयसीएसई (दहावी) मध्ये प्रथम क्रमांकाने वेद जयंत भुसकाडे याला ९६.८० टक्के गुण प्राप्त झाले आहे. त्याला रोबोटिक आणि एआयमध्ये शंभर पैकी शंभर गुण मिळाले. तर दिग्विजय संजय मोरे यांने ९५.४० टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक मिळविला. त्याने इंग्रजी साहित्य विषयात शंभर पैकी शंभर गुण प्राप्त केले आहे. अनुष्का अशोक महाजन हिला ९४.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने ती उत्तीर्ण झाली. याशिवाय जयेश केडीया या विद्यार्थ्यांनी इतिहास विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळविले आहे. त्याशिवाय ९० टक्क्यांच्यावर नऊ विद्यार्थी तर ८० ते ९० टक्क्यांदरम्यान १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. अनुभूती निवासी स्कूल ही भविष्याशी निगडीत **(पान २ वर)**

> ''श्रद्धेय भवरलालजी जैन यांच्या विचारांवर आधारित शैक्षणिक मूल्य जपणाऱ्या अनुभूती निवासी स्कूलच्या स्थापनेपासून (२००७ पासून) विद्यार्थ्यांनी यंदाही १०० टक्के निकाल राखला. या सुयशाबद्दल सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन! देशाचे उज्वल भविष्य विद्यार्थ्यांमध्ये असून निसर्गरम्य वातावरण, स्पर्धात्मक जगाशी सामना करण्याची ताकद अनुभूतीच्या विद्यार्थ्यांत आहे.''
>
> **– अशोक जैन, अध्यक्ष,**
> **जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.**



## शिष्यवृत्ती परीक्षेतील दहा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शेंदुर्णी** प्रतिनिधी

शेंदुर्णी सेकंडरी एज्युकेशन सोसायटीतर्फे गरुड शाळेतील पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव सगरमल जैन, संचालक यू यू पाटील सर, वसतिगृह सचिव गोविंद सूर्यवंशी, मुख्याध्यापक आर एस चौधरी सश पर्यवेक्षक विनोद पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पेन पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या परीक्षेत ३२ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर ३०० पैकी १९८ गुण मिळवून मनीष सचिन पाटील **(पान २ वर)**

## भाजप अध्यक्ष निवडीत गोविंद शेलार व शोभा तेली यांची सरशी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी





भारतीय जनता पार्टीचे संघटनपर्व अभियान अंतर्गत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या तालुका अध्यक्ष पदाच्या निवडीत गोविंद चंद्रकांत शेलार (नगरदेवळा) आणि शोभा शांतीलाल तेली (पिंपळगाव) यांची वर्णी लागली आहे. पक्षाच्या धोरणानुसार पाचोरा तालुक्यात पाचोरा शहर तसेच नगरदेवळा आणि पिंपळगाव हरेश्वर असे तालुकास्तरीय तीन मंडळ निर्माण करण्यात आले. यातील नगरदेवळा मंडलाच्या अध्यक्षपदी गोविंद चंद्रकांत शेलार तर पिंपळगाव मंडलाच्या अध्यक्षपदी शोभा शांतीलाल तेली यांची निवड करण्यात आली. शासकीय विश्रामगृह येथे संपन्न झालेल्या विशेष बैठकीत निवडणूक निर्णय अधिकारी धनंजय सुकदेव मांडोळे जिल्हा सरचिटणीस जळगाव पश्चिम यांनी ही निवड घोषित केली. याप्रसंगी तालुक्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकिचे सूत्रसंचलन जिल्हा उपाध्यक्ष मधुकर काटे यांनी केले. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या सर्वसामान्य कुटुंबातील, कोणतीही राजकिय **(पान २ वर)**

## मुकुंद नगर केंद्रात स्वामी पुण्यतिथी निमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र मुकुंद नगर जळगाव व शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमानाने श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त महिला व पुरुषांसाठी दिनांक २६/०४/२०१५ शनिवार रोजी मोफत आरोग्य तपासणी रोगनिदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात वैद्य डॉ. वर्षा गणेश बारी यांच्या समवेत सहाय्यक प्राध्यापक डॉक्टर पांढरे यांनी सहभागी होऊन रुग्ण तपासणी केली. या शिबिरासाठी आयुष्य संचालक व अधिष्ठाता डॉ. रामन घुंगराळेकर यांचे मार्गदर्शन व प्रभारी अधिष्ठाता डॉ. अभिजीत अहिरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. इतर स्टाफ त्यांनी महिलांची व पुरुषांची तपासणी करून मोफत औषधी दिल्यात. या शिबिरामध्ये केंद्रातील व परिसरातील ८० महिला व २५ पुरुषांनी आरोग्य तपासणी करून शिबिराचा लाभ घेतला. याचबरोबर श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी अखंड नामजप यज्ञ सप्ताह निमित्त गुरुचरित्र पारायण सप्ताहाची सांगता सकाळी १०. **(पान २ वर)**

## मुबारक तडवींचे दारूविक्री विरोधात आमरण उपोषण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चुंचाळे** प्रतिनिधी

यावल तालुक्यातील आंदोलन आणि उपोषनाणे नावाजलेली चुंचाळे ग्रामपंचायत, येथे आमरण उपोषणाची सुरुवात १ में महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून गावात दारू बंदी झाली पाहिजे, तसेच ठराव मंजूर करून ६ महिने झाले तरी ग्रा. पं. ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच व सदस्य यांनी कार्यवाही केली नाही, माझी फसवणूक केली, समंधितांवर देखील कार्यवाही व्हावी म्हणून मुबारक नबाब तडवी यांचे आमरण उपोषणाला सुरुवात होत आहे. सविस्तर वृत्त असे कि, ग्रामपंचायत चुंचाळे सरपंच, उपसरपंच व सदस्य यांनी दि. ८/१०/२०२४ रोजी घेण्यात आलेल्या मासिक सभेमध्ये (ठराव क्र. ०८ने) गावात दारूबंदी ठराव करण्यासंदर्भात मुबारक नबाब तडवी यांचा ५/९/२०२४ रोजी गावात दारूबंदी करण्या संदर्भात **(पान २ वर)**

## सिंधूताई सपकाळ यांचे फैजपूरशी असलेले ऋणानुबंध कायम आठवणीत : नरेंद्र नारखेडे

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**फैजपूर** प्रतिनिधी




हजारो अनाथ निराधार मुला मुलींना आईचे प्रेम देणाऱ्या अनाथांची माय झालेल्या माईसाहेब सिंधुताई सपकाळ यांचे फैजपूर शहराशी असलेले ऋणानुबंध व भावनिक नाते फैजपूर कर कधीच विसरणार नाही त्या आमच्या कायम आठवणीत आहे असे भावनिक उदगार फैजपूर येथील सहकार भारती जिल्हाध्यक्ष व सिनेट सदस्य नरेंद्र नारखेडे यांनी सिंधुताई सपकाळ यांचे शिरूर जिल्हा पुणे येथील अनाथ आश्रम तथा ग्लोबल मदर फाऊंडेशन येथे निराधार मुलांना भेटीचे प्रसंगी भावना व्यक्त केल्या. सिंधू ताई यांनी आता पर्यंत सुमारे २१०० चे वर मुला मुलींचे मातृत्व स्वीकारून त्यांचे बाल संगोपन करून त्यांनी उच्च शिक्षण देऊन समाजाचे मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संपूर्ण **(पान २ वर)**



## तालुकास्तरीय बक्षीस वितरणाचा कार्यक्रम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल** प्रतिनिधी

यावल पंचायत समिती सभागृहामध्ये शिक्षण विभागामार्फत सन २०२४/२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये मा. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत प्रतियोगितेचे शासनातर्फे आयोजन करण्यात आले होते. यात तालुक्यातील विविध शाळांनी सहभाग घेतला होता यामध्ये मा. मुख्यमंत्री शाळा माझी शाळा सुंदर अंतर्गत शारदा विद्या मंदिर साकळी या विद्यालयाचा प्रथम क्रमांक आलेला आहे. **(पान २ वर)**

## वाचन करून महापुरुषांची जयंती साजरी : विद्यार्थ्यांचा सत्कार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी



महापुरुषांची जयंती नाचून साजरी करण्याच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती वाचून साजरी करणाऱ्या चिंचखेडा बु. येथील जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त चिंचखेडा बु. या छोट्याशा गावातील जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी वकृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा आणि रंगभरण स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन आगळीवेगळी जयंती साजरी केली. त्यात प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, मेडल, ट्रॉफी आणि वही पेन पेन्सिल देवून गौरविण्यात आले. वकृत्व स्पर्धा – स्वाती मधुकर गावंडे (प्रथम), उत्कर्षा पांडुरंग दिवाने (द्वितीय), लक्ष्मी शेषराव इंगळे (तृतीय). निबंध स्पर्धा – सायली शरद गावंडे (प्रथम) स्वाती मधुकर गावंडे (द्वितीय) विराज वाल्मीक गावंडे (तृतीय). रंगभरण स्पर्धा – सायली शरद गावंडे (प्रथम) नंदनी सुनील लिंगे (द्वितीय) पुष्कर विकास पाटील (तृतीय). उत्तेजनार्थ बक्षीस – भाविका पाटील, अंजुमबी फकीर, रीता कोळी, राधिका धायडे, स्वराज गायगोळ, सोहम गावंडे, दर्पण बावस्कर, काजल तायडे, आदित्य कोळी, अथर्व तायडे, मयुरी पिळोदकर, देविका तायडे, वैष्णवी कोळी, रक्षा खोंदले, प्रतीका धायडे, तेजल कचरे, तनुजा नमायते, सारिका पिळोदकर, वेदिका पाटील, तेजस्विनी खोंदले, अर्णव कांडेलकर, रितेश बावस्कर, मोहित नमायते, श्रुती पिळोदकर, प्राची देशमुख, गायत्री पाटील, रितिका कांडेलकर, सुवर्णा मोरे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून **(पान २ वर)**

## साकळी येथे दोन दिवशीय उन्हाळी शिबिर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल** प्रतिनिधी



साकळी येथील शारदा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय साकळी येथे दोन दिवसीय उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा विद्या महाजन होते तर व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष सुभाषराव महाजन, कार्याध्यक्ष प्रमोद सोनवणे, शामकांत वसंतराव महाजन, संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी आदर्श विद्यालय दहिगावचे कला शिक्षक अजय पाटील, चंद्रकांत नेवे, विद्यालयाचे प्राचार्य आर जे महाजन, पर्यवेक्षक एस जे पवार, बी ई महाजन, सौ विद्या वसंतराव महाजन इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य समाधान बडगुजर, परिसरातील जि प शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे व संस्थेचे माज़ी अध्यक्ष कै दादासाहेब वसंतराव रामजी **(पान २ वर)**

# आजपासून सर्व प्रकारच्या रासायनिक खतांची खरेदी बंद

## माफदा संघटनेचा निर्णय : लिंकींगचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत संघटना आक्रमक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मोरगाव ता.रावेर** प्रतिनिधी



गेल्या काही वर्षापासून रासायनिक खते बनविणाऱ्या व विक्री करणाऱ्या काही कंपन्या विनाकारण काही कॉम्प्लेक्स खतांवर किंवा युरीया, पोटॅश यासारख्या मागणी असलेल्या रासायनिक खतांवर त्यांच्या इतर उत्पादनाची सक्ती किंवा लिंकींग करून होलसेल विक्रेता यांना देतात. तेच होलसेल विक्रेते खाली किरकोळ विक्रेत्यांना याच प्रमाणे खते विक्री करतात. आणि किरकोळ विक्रेता मग या सर्व प्रकारामध्ये भरडला जातो. शेतकरी जेव्हा युरीया किंवा डि. ए. पी. खत घ्यायला किरकोळ दुकानात जातो तेव्हा तो किरकोळ दुकानदार त्याला त्या खतासोबत आलेले लिंकींग खत घेण्यासाठी आग्रह करतो. परंतु शेतकरी ते लिंकींग आलेले खत घ्यायला तयार नसतो व उगाचच त्या किरकोळ दुकानदाराची व शेतकऱ्यांची तू तू मै मै होत असते व एवढ्या वर्षांपासून त्यांचे असलेले जिव्हाळ्याचे संबंध बिघडतात. एखाद्या किरकोळ दुकानदाराने जर विना लिंकींग खत द्यायचे म्हटले तर त्याला जे लिंकींग खत आलेले आहे. ते तसेच पडून राहते त्यामुळे आर्थिक नुकसान होत असते. अशी एक ना अनेक उदाहरण लिंकींग खताबद्दल व किरकोळ दुकानदाराबद्दल देता येतील. या सर्व गोष्टींपासून सुटका व्हावी व कायमस्वरूपी लिंकींगचा प्रश्न सुटावा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा संघटनांनी माफदा संघटनेला पाठिंबा दर्शविलेला आहे. म्हणून दि. १ मे २०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या रासायनिक खतांची खरेदी बंदचा निर्णय माफदा संघटनेतर्फे घेण्यात आला आहे. तसेच जोपर्यंत लिंकींगचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत आम्ही कोणताही होलसेल व किरकोळ विक्रेता रासायनिक खतांची खरेदी करणार नाही, असे एका किरकोळ दुकानदाराने नांव न छापण्याच्या अटीवर आमच्या प्रतिनिधींना सांगितले.

दैनिक लोकशाही 'लोक'राज्य next
६
जळगाव, गुरुवार दि.१ मे २०२५
epaper.lokshahilive.com

## राज्यभरातील शाळांची उन्हाळी सुट्टी जाहीर

**अमरावती :** उन्हाळा सुरु होताच शालेय मुलांना उन्हाळी सुट्टीचे वेध लागते. त्यामुळे परीक्षेनंतर कधी उन्हाळी सुट्टीची घंटा वाजते याकडे सर्व विद्यार्थ्यांचे लक्ष लागून असते. राज्य शिक्षण विभागाकडून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या जाहीर केल्या आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुटीच्या कालावधीमध्ये एकवाक्यता, सुसंगती राहण्यासाठी उन्हाळी सुटी, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरू करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील शाळांना २ मेपासून उन्हाळी सुटी जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील इतर मंडळांच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरू असल्यास किंवा अशा शाळांमध्ये महत्त्वाचे शैक्षणिक उपक्रम राबवण्यात येत असल्यास विद्यार्थ्यांना सुटी जाहीर करण्याबाबत शाळा प्रशासनाने उचित निर्णय घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. पुढील शैक्षणिक वर्ष १६ जून रोजी सुरू करावेत.

## महत्वाचे

### मध्यवर्ती बँकेत साडेतीन कोटींचा घोटाळा

**कोल्हापूर :** जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वारणानगर शाखेत तब्बल ३ कोटी २१ लाख ६१९ रुपयाचा अपहार झाला आहे. पे स्लिप, धनादेश आणि खोट्या सह्या करून बँकेतील कर्मचाऱ्यांनीच संगणमत करून पैसे हडप केल्याच्या समोर आले आहे. याप्रकरणी कोडोली पोलिसात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी रोखपाल मुकेश पाटील, शिवाजी पाटील, मीनाक्षी कांबळे, शरीफ मुल्ला या चौघांना अटक केली आहे. शाखाधिकारी तानाजी पवार यांचा पोलिसांनी शोध सुरू केला आहे. १५ जुलै २०२१ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीत शाखाधिकारी, रोखपाल आणि कारकून यांनी संगणमत करून बँकेची आर्थिक फसवणूक केल्याचे समोर आल्यानंतर जिल्हा बँकेने यासंदर्भात पोलिसात गुन्हा नोंद केला आहे.

### अमिष दाखवून ३० लाखांना लुटले!

**जिन्सी :** शेअर मार्केट मध्ये दिवसाला १० ते १५ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून ठेकेदार शेख मोहम्मद अब्दुल साजीद यांना सायबर गुन्हेगारांनी अवघ्या तीस दिवसांत ३० लाख ५७ हजारांना लुटले. जिन्सी पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. यू ट्यूबवर सर्चिंग करत असताना अब्दुल साजीद यांना आयसीआय सिक्युरिटीज ग्रुपची शेअर मार्केट मधील गुंतवणुकीची जाहिरात दिसली. त्यावर त्यांनी संपर्क केल्यानंतर व्हॉट्सअॅपवर त्यांना विनिता पटोदिया नावाने एका महिलेने संपर्क केला. लिंक पाठवून अॅप इंस्टॉल करण्यासाठी सांगितले. त्यानंतर ४ मार्च रोजी अब्दुल यांनी ५० हजारांची गुंतवणूक केली. त्यानंतर ६ मार्च रोजी १० लाख रुपये पाठवले. असे करत ३० लाख रुपयांना गंडा घालण्यात आला.

### राज ठाकरे परदेश दौऱ्यावरुन परतले!

**मुंबई :** ठाकरे गट आणि मनसेच्या युतीच्या चर्चा सुरू असतानाच मनसेप्रमुख राज ठाकरे परदेश दौऱ्याहून परतले आहेत. राज आणि उद्धव या या ठाकरे बंधूंनी युतीबाबत आपल्या नेते व पदाधिकाऱ्यांना न बोलण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे दोन्ही पक्षांचे प्रमुख असलेले ठाकरे बंधू आता युतीबाबत नेमकी काय भूमिका मांडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज आणि उद्धव ठाकरे एकत्र आले तर हा निर्णय महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी देणारा ठरेल.

### नोकरीसाठी दूर जाण्याची गरज नाही!

**नवी दिल्ली :** भारत सरकार 'आपल्या शहरात नोकरी' या पुढाकारावर काम करीत असून तो सफल झाला तर लोकांना नोकरीच्या शोधार्थ शहर सोडून दुसऱ्या शहरात जाण्याची गरज भासणार नाही. श्रम व रोजगार मंत्रालय त्यासाठी एक यंत्रणा विकसित करीत आहे. यात नोकरी शोधणाऱ्यांना स्थान, क्षेत्र, रोजगारदाता, वेतनमान, आवश्यक कौशल्ये आणि इतर वैशिष्ट्यांच्या आधारे नोकऱ्यांची छानणी करता येऊ शकेल. मंत्रालय 'पीएम गतिशक्ति पोर्टल'वर नोकऱ्यांच्या आकडेवारीचे मॅपिंग करीत आहे. श्रम व रोजगार मंत्रालयाचे 'राष्ट्रीय करिअर सेवा' पोर्टल हे रोजगारदाते व रोजगार इच्छुकांना जोडणारा डिजिटल बाजार म्हणून काम करते. नोकऱ्यांची मागणी आणि पुरवठा यांचे संतुलन राखण्याचे काम करते.

# त्याग आणि संघर्षाची आठवण असलेला महाराष्ट्र दिन!

## हुतात्म्यांचे बलिदान अन् मुंबई झाली महाराष्ट्राची

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा दिवस आहे. दि. १ मे १९६० रोजी मुंबई राज्याचे विभाजन झाले आणि महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. संयुक्त महाराष्ट्र समितीने राज्याच्या विभाजनासाठी मोठे आंदोलन केले. या आंदोलनात अनेक लोकांनी बलिदान दिले. त्यांच्या बलिदानाने दि. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्यामुळे हा दिवस महाराष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो. दि. १ मे १९६० रोजी मुंबई राज्याचे विभाजन झाले. त्यातून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या दिवसाच्या स्मरणार्थ महाराष्ट्र दिन साजरा करतात. या दिवशी परेड, राजकीय भाषणे आणि विविध कार्यक्रम होतात. महाराष्ट्राचा इतिहास आणि परंपरा या




दिवशी जपली जाते. मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी हा दिवस महत्त्वाचा आहे.

सन १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना कायदा आला. या कायद्यानुसार भाषांच्या आधारावर राज्यांच्या सीमा ठरवल्या गेल्या. त्यामुळे मुंबई राज्य तयार झाले. पण, यात मराठी, गुजराती, कच्छी आणि कोकणी भाषा बोलणारे लोक होते. संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबई राज्याचे दोन भाग करण्याची मागणी केली. एक भाग गुजरात आणि कच्छी भाषिकांचा, तर दुसरा मराठी आणि कोकणी भाषिकांचा असावा, अशी मागणी होती. दि. २५ एप्रिल १९६० रोजी संसदेने बॉम्बे पुनर्रचना कायदा, १९६० पास केला. त्यामुळे महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन राज्ये अस्तित्वात आली. हा कायदा १ मे १९६० पासून लागू झाला. २१ नोव्हेंबर १९५६ रोजी फ्लोरा फाउंटन परिसरात तणाव होता. कारण, राज्य पुनर्रचना आयोगाने मुंबई महाराष्ट्राला देण्यास नकार दिला होता. त्यामुळे मराठी लोक नाराज झाले होते. 'महाराष्ट्राला मुंबई देण्यास नकार'

गांधी, शास्त्रींची उदाहरणे देत संजय राऊतांची

# पंतप्रधानांनी शाहांचा राजीनामा घ्यावा!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यामध्ये २६ नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले. या घटनेने देशभरात खळबळ उडाली होती. यावरून आता राजकारण तापताना दिसत आहे. काश्मीरच्या हल्ल्यावरून बोलताना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. त्यासोबतच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

काश्मीरच्या सुरक्षेची जबाबदारी सैनिक आणि गृहखात्यावर होती. त्यामुळे कारवाई करायची असेल तर पंतप्रधानांनी गृहखात्यावर केली पाहिजे. सरकारच्या चुकांच्या पाठिशी आम्ही नाही आहोत, सरकार वारंवार चुका करत आहे हे चालणार नाही. अमित शहांचा राजीनामा घेतला पाहिजे, त्या जागी आमचा मंत्री असता तर त्यांनी आमचा राजीनामा मागितला असता. विरोधी पक्षाचे बोट दाखवणे हे काम आहे यात चुकीचे काय आहे. सर्व पक्षीय बैठकीतून काही साध्य होणार नाही, काश्मीवर चर्चा करण्यासाठी विशेष अधिवेशन बोलवायला हवे. पण सरकार काश्मीर, मणिपूर बोलणार नाही आणि बोलू देणार नाही. सर्वपक्षीय बैठकीमध्ये आम्ही टाळ्या वाजवायच्या का? आमच्या भूमिका आहे, विशेष अधिवेशन बोलवा, दोन दिवस काश्मीरवर चर्चा करा, या हल्ल्याची जबाबदारी असणाऱ्या गृहखात्यावर कारवाई करा, कोण राजकारण करत आहेत. २७ सरकारने घेतलेले नरबळी आहेत. सरकारच्या गाफिलपणामुळे मानवी संहार झाल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

पूलवामा हल्ल्यानंतर हल्ला करायला पाहिजे होता, त्यावेळी ४० जवान मारले गेले आता ते मारले कोणी हा प्रश्न येतो का? राज्यपाल सत्यपाल मलिक सांगत आहेत, वारंवार सांगितले की त्यांना रस्त्याने घेऊन जाऊन नका. म्हणजे सरकारला राजकारणासाठी त्यांना मारायचे होते असे कोण म्हणाले तर त्याला देशद्रोही ठरवले जाईल. पुलवामानंतर हल्ला का झाला नाही. सर्जिकल स्ट्राईक आम्ही गल्लीमध्ये करतो, ५० सालापासून विरोधकांवर सर्जिकल स्ट्राईक करतो. हल्ला इंदिरा गांधी यांनी केला, लाल बहादूर शास्त्रींनी केला त्याला आम्ही हल्ला म्हणतो, असे राऊत म्हणाले.

# सरसंघचालक भागवत अन् पंतप्रधान मोदींमध्ये भेट

## पहलगाम हल्ल्यानंतर झालेल्या भेटीकडे लक्ष

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव कायम आहे. या हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर निर्णय घेतले. दरम्यान, उच्चस्तरीय बैठकांची मालिका सुरूच आहे. पंतप्रधान मोदींनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, एनएसए अजित डोभाल आणि तिन्ही लष्कर प्रमुखांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीनंतर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत पंतप्रधान मोदींना भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी गेले होते. सध्याच्या



घटनांच्या पार्श्वभूमीवर या भेटीला महत्व प्राप्त झाले आहे. कारण २०१४ मध्ये भाजप सरकार स्थापन झाल्यानंतर संघप्रमुखांनी पंतप्रधानांच्या सरकारी निवासस्थानी भेट देण्याची ही पहिलीच वेळ होती.

सूत्रांच्या माहितीनुसार, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भात ही बैठक झाली. पंतप्रधान मोदींनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि तिन्ही सशस्त्र दलांच्या प्रमुखांसह उच्चस्तरीय संरक्षण अधिकाऱ्यांसोबत एक बैठक घेतली. याशिवाय केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही पंतप्रधानांची भेट घेतली. या बैठकींवरून असे दिसून येते की, या हल्ल्यानंतर सरकार सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी गांभीर्याने काम करत आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तीव्र निषेध करतो. संघटनेने याला राष्ट्राच्या एकता आणि अखंडतेवर हल्ला म्हटले आहे आणि दोषींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. संघाने आपल्या निवेदनात म्हटले आहे

### ठोस रणनीती आखण्यावर भर

पहलगाम हल्ल्यामुळे जम्मू आणि काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सरकारने बाधित कुटुंबांना मदत करण्याचे आणि परिसरातील सुरक्षा वाढवण्यासाठी त्वरित पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे. केंद्र सरकार आणि केंद्रशासन यांच्यातील समन्वयासाठी ही बैठक एक महत्त्वाचे पाऊल मानली जात आहे, जेणेकरून असे हल्ले थांबवण्यासाठी ठोस रणनीती आखता येणार आहे.

# टॉन्सीलेक्टोमी उन्हाळी शिबीर

## टॉन्सील विकार रूग्णांसाठी डॉ. पाटील रूग्णालयात उपक्रम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे टॉन्सीलेक्टोमी (घशातील ग्रंथी काढण्याची शस्त्रक्रिया) साठी विशेष उन्हाळी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

गरजू रुग्णांवर अत्यल्प दरात उपचार करण्यात येणार आहे. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या नाक-कान-घसा विभागातर्फे आयोजित शिबीरात जे टॉन्सिलच्या त्रासामुळे दीर्घकाळ पीडित रुग्णांना अल्पदरात उच्च प्रतीच्या वैद्यकीय सुविधांचा लाभ मिळणार आहे. शिबीरासाठी डॉ. उल्हास



पाटील रुग्णालयात विशेष शस्त्रक्रिया विभाग उभारण्यात आला असून, तेथे अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांची सुविधा उपलब्ध आहे. तपासणीसाठी नाक-कान-घसा विभागाच्या प्रमुख डॉ. अनुश्री अग्रवाल, डॉ. पंकजा बेंडाळे, डॉ. सृष्टी पाटील, डॉ. जान्हवी बनकर, डॉ. चारू सोनवणे, डॉ. सायकत बासू, डॉ. रितु रावल, डॉ. अंकीता सोलंकी यांची टीम कार्यरत आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण
मान्यवरांनी केले वृक्षारोपण

# महाबीजचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला (महाबीज) ने ४९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. महाबीज मुख्यालयात आयोजित या कार्यक्रमात महाबीजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या वाटचालीचा जल्लोष करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर होते. यावेळी अकोला पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाबीजचे संचालक वल्लभराव देशमुख, संचालक डॉ. अंकुशराव माने यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात महाबीज मुख्यालयात वृक्षारोपण करून झाली. यानंतर मागील दोन वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणारे बिजोत्पादक, शेतकरी, महाबीज विक्रेते आणि महाबीजचे अधिकारी-कर्मचारी यांना 'महाबीज गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक करताना महाव्यवस्थापक डॉ. प्रफुल्ल लहाने यांनी महाबीजच्या ४९ वर्षांच्या प्रवासातील कर्मचाऱ्यांच्या तीन पिढ्यांचा संगम आणि भविष्यातील वाटचाल यावर माहिती दिली. डॉ. रणजीत सपकाळ यांनी सोयाबीन पिकाला पर्याय शोधण्याची आणि संत्रा व इतर फळपिकांच्या संशोधनावर लक्ष केंद्रित करून नवीन वाण विकसित करण्याची अपेक्षा व्यक्त केली. ज्येष्ठ संचालक वल्लभराव देशमुख यांनी महाबीजच्या स्थापनेपासूनचा इतिहास सांगून चिया सीड्स, हळद आणि राजमा या पिकांचे वाण उपलब्ध करण्याचे कार्य सुरू असल्याचे सांगितले आणि ते जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची आशा व्यक्त केली.

# गोदावरी रुग्णालयात सवलतीत एमआरआय योजना

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

शस्त्रक्रियेसाठी किंवा अपघात ग्रस्त रूग्णांना अनेकदा तातडीने एमआरआय स्कॅनची गरज असते अशा वेळी पैसा नसल्याने अनेक रूग्णांची अडचण होतांना दिसून आल्याने डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाने सवलतीत एम आर योजना सुरू केली आहे.

एमआरआय करायचा म्हटला तर कमीत कमी पाच ते सात हजार रुपये मोजावे लागतात पण जळगावमधील डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात गरजू रुग्णांसाठी सवलतीच्या दरात एमआरआय तपासणीची सेवा उपलब्ध आहे. या उपक्रमाचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय तपासण्या परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे आहे. योजनेचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे गरजू रुग्णांसाठी एमआरआय तपासणी सवलतीच्या दरात उपलब्ध आहे.



ही योजना सामाजिक बांधिलकीच्या अंतर्गत राबवली जाते. ही योजना १५ मे पर्यंत सुरू राहणार असून रूग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन रूग्णालयाने केले आहे. अधिक माहितीसाठी आशिष भिरूड (९३७३९५००१२) यांच्याशी संपर्क साधावा.

# मंदिराची भिंत कोसळल्याने 8 जणांचा मृत्यू

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**विशाखापट्टणम** प्रतिनिधी

बुधवारी सकाळी येथील श्री वराहलक्ष्मी नरसिंह स्वामी मंदिरात चंदनोत्सवम उत्सवादरम्यान मंदिराची भिंत कोसळल्याने ८ जणांचा मृत्यू झाला आहे, यात चारजण जखमी झाले. एसडीआरएफ आणि एनडीआरएफकडून शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. बुधवारी सकाळी विशाखापट्टणममधील सिंहचलम येथील श्री वराह लक्ष्मी नरसिंह स्वामी मंदिरात बांधकाम सुरू असलेली भिंत कोसळून सात भाविकांचा मृत्यू झाला आणि अनेकजण जखमी झाल्याचे वृत्त आहे. वार्षिक चंदनोत्सवादरम्यान ही घटना घडली. स्वामी मंदिरात चंदनोत्सवम उत्सवादरम्यान बांधकाम सुरु असलेल्या इमारतीचा भाग कोसळल्याने ही दुर्दैवी घटना घडली. ही घटना रात्री २.३० च्या सुमारास घडली. यादरम्यान त्या ठिकाणी मुसळधार पाऊस देखील पडत होता.

# भारत विकास परिषदेची कार्यकारिणी जाहीर

## जळगाव शाखेच्या अध्यक्षपदी हेमांगिनी महाजन तर डॉ. दंडगव्हाळ सचिव

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

येथील भारत विकास परिषदेच्या जळगाव शाखेच्या प्रथम महिला अध्यक्ष म्हणून हेमांगिनी महाजन यांची तर सचिव म्हणून डॉ. अनुपम दंडगव्हाळ आणि कोषाध्यक्ष म्हणून अनिरुद्ध कोटस्थाने यांची निवड करण्यात आली.

एका सोहळ्यात त्यांनी शपथ घेत पदाची सूत्रे स्वीकारली. याप्रसंगी खासदार स्मिता वाघ, उद्योजक आनंदराव मराठे, प्रांत महासचिव राजेंद्र जाखडी, शहर संघचालक उज्वल



चौधरी, प्रांत पालक तुषार तोतला यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नूतन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. त्यात सदस्य म्हणून डॉ. योगेश पाटील, डॉ. संजय हांडे, शाम दायमा, जमुना नन्नवरे, अनिता भावसार, चेतन दहाड, डॉ. विकास चौधरी, भूषण गुरव, सुभाष तळेले, उमेश पाटील, उल्हास सुतार, दीपक शेठ, दिनेश थोरात, हर्षाली खडके, गिरीश शिंदे, दीपक पाटील, विशाखा पोतदार, उज्वला चौधरी यांचा समावेश आहे.

मावळते अध्यक्ष विशाल चोरडिया, सचिव राधिका नारखेडे, कोषाध्यक्ष रामेश्वर भावसार यांनी पदभार दिला. विशाल चोरडिया यांनी मनोगत व्यक्त केले. राधिका नारखेडे यांनी केलेल्या कार्याचा अर्थात सचिवांचा अहवाल सादर केला. खासदार स्मिता वाघ यांनी यावेळी कुटुंबातला संस्कार व संवाद हरवत चालला आहे अशी खंत व्यक्त करून बेपत्ता होणाऱ्या मुली व महिलांविषयी चिंता व्यक्त केली. कुटुंब व्यवस्था टिकली पाहिजे असे त्यांनी सांगितले. आनंदराव मराठे यांनी मनोगत व्यक्त केले. राजेंद्र जाखडी यांनी कुटुंब प्रबोधन, समरसता, पर्यावरण या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करून कार्यक्रमाचे नियोजन करावे असे आवाहन केले. सूत्रसंचालन महेश कापुरे यांनी केले. कार्यक्रमास भारत विकास परिषदेच्या सदस्यांची कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर – No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १६ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.